cmyk

## संपादकीय

### सुनेत्रा पवारांच्या राज्यसभेमागे अनेक कंगोरे

बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभव झालेल्या सुनेत्रा पवारांनी आता संसदेत मागच्या दाराने एन्ट्री घेतली आहे असे म्हणावे लागेल. आता अजित पवार गटाचे लोकसभेत एक आणि राज्यसभेचे दोन असे एकूण तीन खासदार होतील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला होता. याच जागेसाठी अजित पवार गटाकडून सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली आहे. राज्यसभेच्या जागेसाठी २५ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६६ | रविवार दि.१६ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची विरोधकांची मागणी

मुंबई : राज्य विधिमंडळाचे पावसाळी आणि अंतिम अधिवेशन येत्या २७ जूनपासून सुरू होत आहे. संसदीय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात यांनी दिली. यावेळी बोलताना थोरात म्हणाले की, विधिमंडळातील सर्व सदस्यांना जास्तीत जास्त बोलण्याची संधी मिळावी तसेच जनतेचे प्रश्न मांडण्याची संधी मिळावी यासाठी अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, अशी आम्ही सरकारकडे मागणी केली; मात्र सरकारने अधिवेशन केवळ दोनच आठवडे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारला हे अधिवेशन गुंडाळण्याची घाई लागली आहे.

# जून अखेरपर्यंत ७५ टक्के पीक कर्ज वाटप करा

## धनंजय मुंडे यांचे आदेश, राज्यातील अधिकाऱ्यांची घेतली ऑनलाईन बैठक



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात बी बियाणे, खते मुबलक प्रमाणात उपलब्ध असून, खतांची अतिरिक्त मागणी येत्या आठवडाभरात पूर्ण होईल. बी- बियाणांची चढ्या भावाने विक्री, बोगस बियाण्यांची विक्री, लिंकिंग यासारख्या गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. तसेच जून अखेरपर्यंत ७५ टक्के पीक कर्जाचे वितरण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शनिवारी त्यांच्या शासकीय निवासस्थानी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बी बियाणे, खते उपलब्धतेबाबत राज्यस्तरीय आढावा घेतला. यामध्ये जिल्ह्यातील खरीप पिके, त्यांच्या बि-बियाणांची व आवश्यक खतांची उपलब्धता, आतापर्यंत झालेला पाऊस, पेरणी, त्याचबरोबर बी बियाणांची आतापर्यंत झालेली विक्री, जिल्ह्यातील पीक कर्ज वाटपाची आकडेवारी, तसेच मागील काळात वितरित करण्यात आलेला किंवा प्रलंबित असलेला पिक विमा या सर्व विषयांचा समग्र आढावा घेतला. या बैठकीसाठी सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, महाबीजचे अधिकारी, कृषी संचालक, कृषी आयुक्त, विभागीय कृषी सहाय्यक संचालक, तसेच सर्व जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी व गुण नियंत्रण विभागाचे संचालक व अन्य अधिकारी आदी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, बी-बियाणे, खत, पुरवठा वितरण सुरळितरित्या पार पाडण्यासाठी विभागाने व संचालक गुणनियंत्रण यांनी सतर्क रहावे. राज्यात सर्वच जिल्ह्यात मुबलक बी बीयाणे आणि खतांचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे कृषी विभाग आणि जिल्हा कार्यालयाने संयुक्तिकरित्या कार्यवाही करून अधिक किमतीने बी-बियाणे अथवा खतांची विक्री करत असल्यास संबंधितांवर कारवाई करून अहवाल सादर ◀◀ पान २ वर

### प्रत्येक जिल्ह्याने इमर्जन्सी हेल्पलाईन व व्हाट्सप नंबर जाहीर करावा

राज्य शासनाने जारी केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याने आपला स्वतःचा एक इमर्जन्सी हेल्पलाईन व व्हाट्सप नंबर स्थानिक स्तरावर जाहीर करावा, जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी त्यावरील तक्रारीची स्वतः दखल घ्यावी तसेच एक तासात शहानिशा करून त्या तक्रारींचे निरसन करावे, असे निर्देश धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले आहेत.

### पीक कर्जाचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी दर आठवड्याला घ्यावा

धनंजय मुंडे म्हणाले की, काही जिल्ह्यात अद्याप पावसाचे प्रमाण कमी असल्याने पेरण्याही उशिरा होतील. या दृष्टीने व अन्य कारणांनी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट राज्यात सरासरी ३५ ते ४० टक्क्यांच्या घरात सध्या पोहोचले आहे, मात्र दरवर्षीचा अनुभव पाहता पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट जून महिने अखेर ७५ टक्के च्या पुढे गेलेच पाहिजे. तसेच या बाबीचा प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर दर आठवड्याला आढावा घ्यावा, अशाही सूचनाही त्यांनी केल्या.

# नरेंद्र मोदींनी तयार केलेले नॅरेटीव्ह नव्हते का?

### उद्धव ठाकरे यांचा पलटवार, महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत भाजपावर टीकास्त्र




**मुंबई । प्रतिनिधी**

**नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आमच्या इंडिया आघाडीवर टीका करताना घरातून नळ तोडून नेतील, मंगळसुत्र काढून घेतील, घरातील म्हैस ओढून नेतील या सारख्या अनेक गोष्टी बोलल्या. तसेच यापूर्वी अच्छे दिन येणार, प्रत्येकाच्या बँक खात्यात १५ लाख रूपये देणार यासह अनेक मोठमोठ्या घोषणा करत भाजपाने आणि मोदी यांनी निवडणूका जिंकल्या असा पलटवार करत त्यांनी हे सगळे नॅरेटीव्ह तयार केलेले नव्हते का असा सवाल शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला आहे.**

नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहात महाविकास आघाडीच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे हे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. या पत्रकार परिषदेपूर्वी महाविकास आघाडीतील घटक पक्षाची एक प्राथमिक बैठक झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, देशातील ◀◀ पान २ वर

### हिजाब बंदीविरोधात मुंबईतील ९ मुलींनी महाविद्यालयाला खेचले हायकोर्टात

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबईतील एनजी आचार्य आणि डीके मराठे कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्सच्या नऊ विद्यार्थ्यांनी कॉलेज प्रशासनाने नुकत्याच लागू केलेल्या ड्रेस कोडला आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यामध्ये विद्यार्थिनींनी हिजाबवरील बंदी हटवण्याची मागणी केली आहे. यासोबतच कॉलेज प्रशासन धर्माच्या आधारे पक्षपात करत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.**


आचार्य महाविद्यालयामध्ये गेल्या वर्षीही हिजाब बंदीचा मुद्दा चर्चेत आला होता आणि त्याविरोधात पुन्हा एकदा याचिका दाखल करण्यात आली आहे. ड्रेस कोडच्या नावाखाली हिजावर बंदी घातली जात असल्याचे याचिकेत म्हटले आहे. या ड्रेस कोड अंतर्गत विद्यार्थिनींना कॅम्पसमध्ये हिजाब घालण्यापासून रोखण्यात आले होते. याचिका दाखल करणाऱ्यांमध्ये, बी एसी. आणि बी एसी. (कॉम्प्युटर सायन्स) च्या द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींचा समावेश आहे. त्यांनी दावा केला की, नवीन ड्रेस कोड त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत आहे. याचिकाकर्त्या विद्यार्थिनींनी म्हटले आहे की, महाविद्यालयाचे विश्वस्त, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयात आयोजित वार्षिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुरुवातील त्यांच्या पूजा किंवा धार्मिक विधी आणि त्यांचा प्रचार करतात. पण याचिकाकर्त्यांना ◀◀ पान २ वर

# संघानंतर शरद पवारांचे अजितदादांबद्दल मोठे विधान

### आरएसएसने म्हटले अजितदादांमुळे भाजपची ब्रँड व्हॅल्यू कमी झाली

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महायुतीमध्ये घेतल्याने भाजपची ब्रँड व्हॅल्यू कमी झाली, अशी टीका संघाचे मुख्यपत्र असलेल्य ऑर्गनायझर नियतकालिकातून करण्यात आली होती. त्यानंतर लोकशाहीमध्ये सर्वांना मत मांडण्याचा अधिकार आहे. मी विकासावर लक्ष केंद्रीत केले आहे, असे अजित पवार यांनी म्हटले. दरम्यान, आता शरद पवारांनी ब्रँड व्हॅल्यूच्या प्रश्नाबाबत उत्तर दिले आहे. संघानंतर शरद पवारांनीही अजितदादांवर मोठे विधान केले आहे. यशवंतराव सेंटर मुंबई येथे महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते.





अजित पवार यांच्यामुळे भाजपची ब्रँड व्हॅल्यू कमी झाली, अशी टीका नुकतीच संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझर नियतकालिकातून करण्यात आली होती. याबाबत शरद पवारांना विचारले असता ते म्हटले की, त्यांचा अनुभव काय तो त्यांनी सांगितला. पण त्यांना नेमकं एवढेच सांगायचे आहे की, महाराष्ट्रातील जनतेने आमचा पराभव केला. त्याची कारणं अनेक आहे, पण ती आता आम्ही बोलू इच्छित नाही, असे उत्तर शरद पवार यांनी दिले. देशात होत असलेल्या सत्तेच्या गैरवापरासंबधी या निवडणुकीतून लोकांनी जी भूमिका घेतली, त्यामधून शहाणपणा शिकतील, अशी अपेक्षा होती. पण तो शहाणपणा सरकार शिकेल, असे दिसत नाही. ◀◀ पान २ वर

### एमएचटी सीईटीचा आज निकाल

मुंबईः राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षमार्फत (सीईटी सेल) अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या एमएचटी सीईटीचा निकाल आज रविवारी (दि. १६) सायंकाळी ६ वाजता जाहीर होईल, अशी माहिती सीईटी सेलच्या वतीने देण्यात आली आहे. अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ◀◀ पान २ वर

# एकनाथ खडसे अन् गिरीश महाजनांमध्ये पॅचअप होणार?

### मंत्री रक्षा खडसे करणार मध्यस्थी; भाजपात एकत्र काम करणार का?







**जळगाव । प्रतिनिधी**

रावेर लोकसभा मतदारसंघातून भाजपच्या तीन टर्म खासदार राहिलेल्या रक्षा खडसे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. त्यांच्यावर केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मंत्रिपदाचा पदभार ◀◀ पान २ वर

### आरोप-प्रत्यारोप थांबवून दोघांनी एकत्र यावे

गेल्या चार-पाच वर्षांपासून मी या दोघांचा संघर्ष बघत आलेली आहे. परंतु माझी देखील प्रामाणिक इच्छा आहे की, दोन्ही ज्येष्ठ नेत्यांनी एकत्र आलं पाहिजे. मागील काळामध्ये जेव्हा हे दोन्ही नेते एकत्र होते तेव्हा जळगाव जिल्ह्यासाठी खूप चांगलं काम त्यांच्या माध्यमातून झालं आहे. मात्र मागील काळात काही नाथाभाऊंच्या आणि काही गिरीश भाऊंच्या ज्या चुका झालेल्या आहेत. एकमेकांवरील आरोप प्रत्यारोप त्यांनी केले आहेत. आता चांगली संधी आहे हे आरोप-प्रत्यारोप थांबवून दोघांनी एकत्र आले पाहिजे. कारण गिरीश भाऊ स्वतः मंत्री आहेत आणि जिल्ह्यात आता चार मंत्री आहेत. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन जर काम केले तर नक्कीच आपल्या जिल्ह्याचा खूप चांगला विकास होईल, असा विश्वास रक्षा खडसे यांनी व्यक्त केला.

# पालकमंत्री धनुभाऊंनी पुसले पीडित कुटुंबीयांचे अश्रू

## पीडित वायभासेंच्या दोन्ही मुलांसाठी आर्थिक मदत



**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सर्वात चर्चेत आणि लक्षवेधी ठरलेली लढत म्हणजे बीड लोकसभा मतदारसंघ. बीडमध्ये पंकजा मुंडे विरुद्ध बजरंग सोनवणे यांच्यात शेवटच्या फेरीपर्यंत अत्यंत अटीतटीचा सामना पाहायला मिळाला. या लढतीचा निकाल राज्यात सर्वात शेवटी लागला. त्यामध्ये, पंकजा मुंडेंचा ६ हजार मतांनी पराभव झाला. त्यामुळे, पंकजा मुंडेंच्या समर्थकांची मोठी नाराजी झाली. आपल्या नेत्या पंकजाताईंचा पराभव झाल्याने अनेकांनी मतदार मतमोजणी केंद्रावरच अश्रू ढाळले. तर, बीड जिल्ह्यात या पराभवाचे पडसादही पाहायला मिळाले. काही ठिकाणी आत्महत्यासारख्या घटना घडल्या. आष्टी तालुक्यातील एका युवकाने पराभव सहन न झाल्याने जीवन संपवले. ◀◀ पान २ वर

### दोन्ही मुलांच्या नावे अडीच लाखांची मुदत ठेव

मृत पोपटराव यांस एक मुलगा, मुलगी व पत्नी असा परिवार आहे. या संपूर्ण परिवाराची तसेच दोन्ही लेकरांच्या शिक्षणाची जबाबदारी आपण घेत असल्याचे धनंजय मुंडेंनी सांगितले. दोन्हीही मुलांच्या नावे प्रत्येकी अडीच लाख रुपयांची मुदत ठेव देखील धनंजय मुंडे यांच्या वतीने पोपटराव यांच्या मुलांना देण्यात येत आहे. यावेळी शिवा शेकडे, सुधीर भाऊ पोटे, प्रदीप वायभासे, सचिन वायेभासे, सचिन घुले, प्रा कैलास वायभासे, विलास वायभासे, युवराज वायभासे देवळलीचे सरपंच पोपट शेकडे, गंगादेवीचे सरपंच विठ्ठल नगरगोजे, दत्तू शेकडे आदी उपस्थित होते.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१५ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २.०० क्विंटल | २,३५१ | २,८०१ | २,५७६ |
| ज्वारी/हायब्रिड :१८.५० क्विंटल | २,१०० | २,४७० | २,३२० |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,२३० | ७,२३० | ७,२३० |
| तूर : १.५० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ६.०० क्विंटल | २,३०० | २,५९० | २,४८४ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: २३.५० क्विंटल | ४,४२५ | ४,४५० | ४,४३७ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ४,२०० | ६,४५२ | ५,३२६ |

# राज्यात ‘कृषी संजीवनी’ पंधरवड्याचे आयोजन

## पंधरा दिवस रोज असणार विविध कार्यक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांत जनजागृती करण्यासाठी राज्यात कृषी संजीवनी पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती निमित्ताने दि. १७ जून २०२४ ते दि. ०१ जुलै २०२४ या कालावधीत ‘कृषी संजीवनी’ पंधरवडा आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.**

डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती निमित्ताने आयोजित या पंधरवड्याची सुरुवात १७ जून पासून होणार असून सांगता १ जुलैला म्हणजेच वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनी होणार आहे. १ जुलै हा महाराष्ट्रात ‘कृषि दिन’ म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात या पंधरवड्यामध्ये प्रत्येक दिवशी वेगवेगळे विषय आणि मुद्यांवर शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे हा या कृषि संजीवनी पंधरवडा कार्यक्रमाचा उद्देश राहणार आहे. या कालावधीत प्रत्येक वेगवेगळ्या महत्त्वाच्या मोहिमांवर विशेष भर देऊन ‘‘कृषी संजीवनी पंधरवडा साजरा करावयाचा आहे. संपूर्ण राज्यातून एकाच दिवशी एकाच मोहिमेचा प्रचार व प्रसिद्धी होत आहे.




### कृषी संजीवनी पंधरवड्याची रूपरेखा

१७ जून – बीजप्रक्रिया जनजागृती दिन., १८ जून – पी. एम. किसान उत्सव दिवस, १९ जून – जमिन सुपीकता जागृती दिन,२० जून – गुणवत्तापूर्ण निविष्ठांची ओळख दिन, २१ जून – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड व तंत्रज्ञान प्रसार, २२ जून – पिक विमा जनजागृती दिन, २३ जून – हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान प्रसार दिन, २४ जून – सोयाबीन व मका लागवड तंत्रज्ञान दिन, २५ जून – कापूस, भात व ऊस लागवड तंत्रज्ञान दिन, २६ जून – तूर व इतर कडधान्य लागवड तंत्रज्ञान दिन, २७ जून – कृषि महिला शेतकरी सन्मान दिन, २८ जून – जिल्ह्यातील महत्त्वाच्या पिकांची कीड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना, २९ जून – शेतकरी मासिक वाचन दिन व वर्गणीदार वाढविणे, ३० जून – प्रगतशील शेतकरी संवाद दिन, ०१ जुलै – कृषि दिन.

cmyk

## अग्रलेख

# सुनेत्रा पवारांच्या राज्यसभेमागे अनेक कंगोरे

बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभव झालेल्या सुनेत्रा पवारांनी आता संसदेत मागच्या दाराने एन्ट्री घेतली आहे असे म्हणावे लागेल. आता अजित पवार गटाचे लोकसभेत एक आणि राज्यसभेचे दोन असे एकूण तीन खासदार होतील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला होता. याच जागेसाठी अजित पवार गटाकडून सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली आहे. राज्यसभेच्या जागेसाठी २५ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या जागेसाठी सुनील तटकरे, छगन भुजबळ, आनंद परांजपे, बाबा सिद्दिकी, पार्थ पवार यांच्या नावांचीही चर्चा होती. मात्र सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

पार्थ पवार यांचा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मावळ मतदारसंघातून पराभव झाला होता तर यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना बारामतीतून पराभवाचा धक्का सहन करावा लागला. या पार्श्वभूमीवर आपल्या कुटुंबातील एका सदस्याचे राज्यसभेच्या माध्यमातून राजकीय पुनर्वसन करण्याचा अजित पवार यांचा प्रयत्न होता. बैठकीत प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता आणि आपली भूमिका मांडण्यास सांगितले होते. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रफुल्ल पटेलांच्या प्रस्तावाला अनुमोदन दिले होते. मात्र, राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते छगन भुजबळ यांनी या प्रस्तावावर नाराजी व्यक्त केली होती. मी आणि आनंद परांजपे या उमेदवारीसाठी इच्छुक होतो असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. मी राज्यसभेच्या जागेसाठी इच्छुक होतो पण पक्षाच्या नेत्यांनी निर्णय घेतला आहे. पार्टीत वरिष्ठ निर्णय घेतात. पक्षाने घेतलेला निर्णय मान्य करावा लागेल, असे म्हणत भुजबळांनी अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त केली. महायुतीतील मतांची विभागणी टाळण्याकरिता सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे. ऐनवेळी उमेदवारी घोषित केली जात असेल तर त्याचा अर्थ उमेदवार आधीच निश्चित झाला आहे असा होतो. मग उमेदवारी घोषित करण्यासाठी उगाचच वेळ का घालवण्यात आला असा प्रश्न उपस्थित होतो आहे. अर्थात बंडोबांना थंडोबा करण्यासाठी अशी चाल खेळली जाते. सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील एक गट नाराज आहे. पक्षात केवळ सुनील तटकरे, अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल हेच निर्णय घेत असून इतरांशी सल्लामसलत केली जात नाही याबाबत एका गटात नाराजी असल्याचे स्पष्ट दिसत आहे. यामागे अनेक कंगोरे आहेत. केंद्रात सुनील तटकरे यांना मंत्रिपद द्यावे असा आमदारांच्या एका गटाचा आग्रह होता. कारण प्रफुल्ल पटेल यांना केंद्रात मंत्रिपद दिल्यास त्याचा पक्षाला काहीच फायदा होणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. कारण पटेल लोकनेते नाहीत, शिवाय महाराष्ट्रात त्यांचे राजकीय वजनही नाही. केंद्रामध्ये त्यांची ऊठबस असली तरी पक्षाला त्याचा फायदा होणार नाही. यामुळेच तटकरे यांना मंत्रिपद देण्याची मागणी होत होती. राज्यसभा निवडणुकीत भुजबळांना संधी देण्यात आली असती तर ते केंद्रीय मंत्रिपदाच्या शर्यतीत येऊ शकले असते. भाजपने त्यांनाची पसंती दिली असती. कारण भुजबळांच्या मागे ओबीसी मते असल्यामुळे त्याचा फायदा भाजपला देखील झाला असता म्हणून त्यांच्या मंत्रिपदाच्या नावाला अमित शहा यांनी प्रथम पसंती दिली असती. राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी भुजबळांच्या नावाला यामुळेच विरोध केला असणार अशी शंका घ्यायला जागा आहे. आता राज्यसभेसाठी सुनेत्रा पवारांना संधी देण्यात आल्याने राजकीय पदे कुटुंबातील व्यक्तीलाच देण्यावरून अजित पवारांवर टीकेची झोड उठणार हे उघड आहे. सुनेत्रा पवारांना राज्यसभेची खासदारकी मिळणार असली तरी त्यांना आपला कार्यकाळ पूर्ण करता येणार नाही. कारण राज्यसभा खासदाराचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो. परंतु प्रफुल्ल पटेल हे महाविकास आघाडीच्या कार्यकाळात राज्यसभा खासदार म्हणून निवडून गेले होते. त्यांचा कार्यकाळ जुलै २०२२ ते जुलै २०२८ असा होता. पण पटेल यांनी मार्च २०२४ मध्ये राजीनामा देऊन पुन्हा राज्यसभा खासदारकी मिळवली. त्यामुळे पटेल यांचा कार्यकाळ मार्च २०२४ ते मार्च २०३० असा असणार आहे. सुनेत्रा पवार पटेल यांच्या रिक्त जागेवर पोटनिवडणुकीचे उमेदवार म्हणून उभ्या होत्या. त्यामुळे त्यांना जून २०२४ ते जुलै २०२८ असा चार वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे. मात्र काही का असेना खासदारकीची लॉटरी त्यांना लागली हेही कमी नाही.

## भारत सासणे, देविदास सौदागर यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला यंदाचा बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर तुळजापूर येथील देविदास सौदागर यांच्या 'उसवण' या कादंबरीला साहित्य अकादमीचा मराठी भाषेतील युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी शनिवारी (दि.१५ जून) विविध भाषांतील बालसाहित्य तसेच युवा पुरस्कारांची घोषणा केली. यंदा जाहीर झालेल्या साहित्य अकादमी पुरस्कारामध्ये असामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, राजस्थानी, संताली, सिंधी, तमिळ, तेलगू आणि उर्दू भाषेतील लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे. सुसंस्कृत भाषेतील पुरस्कारांची घोषणा नंतर केली जाणार आहे, असेही अकादमीच्या अध्यक्षांनी स्पष्ट केले आहे. सरस्वती सन्मानप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे, किरण गुरव आणि श्रीकांत उम्रीकर यांच्या परीक्षक समितीने मराठी भाषेतील युवा पुरस्काराच्या साहित्यकृतीची निवड केली आहे. तर ज्येष्ठ बाल साहित्यिक राजीव तांबे, हिंदी, मराठी लेखक आणि अनुवादक विजय प्रभाकर नागरकर आणि मराठी लेखक विनोद शिरसाठ यांनी बालसाहित्याची निवड केली.

### जामखेड येथील कन्या विद्यालयात पाचवीत प्रवेश घेतलेल्या मुलींची बैलगाडीतून मिरवणूक

## सामान्य विद्यार्थ्यांना एका उंचीच्या शिखरावर नेणारी शाळा-प्रा.मधुकर राळेभात

**जामखेड । प्रतिनिधी**

**सर्व सामान्य व गोरगरीबांची शाळा म्हणून कन्या विद्यालयाकडे पालकांचा व मुलींचा कल आहे.सामान्यातील सामान्य विद्यार्थ्यांना एका उंचीच्या शिखरावर नेणारी ही शाळा आहे.म्हणून आदर्श आणि चांगले पालक या शाळेची निवड करतात.शाळेचा स्टाफ ही आपल्या निवडीचा आदर करून गुणवंत मुले घडविण्यासाठी प्रयत्न करित राहिले.असे यावेळी स्कूल कमिटी चे सदस्य तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्राध्यापक मधुकर राळेभात यांनी व्यक्त केले.**



आज दिनांक १५ जून २०२४ रोजी रयत शिक्षण संस्थेचे कन्या विद्यालय येथे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली.यावेळी पाचवीच्या नवीन विद्यार्थिनींचे गुलाब पुष्प व नवीन पुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्कूल कमिटी सदस्य प्रा. मधुकर राळेभात, सुरेश भोसले, प्रकाश सदाफुले ,मुख्याध्यापिका सौ. के.डी चौधरी मॅडम, पर्यवेक्षक संजय हजारे,गुरुकूल प्रमुख बाबासाहेब आंधळे, सुग्रीव ठाकरे,विलास पवार,आदी शिक्षक, शिक्षिका पालक व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.बैलगाडीतून मिरवणूकीचे संकल्पना संतोष सरसमकर यांची होती.तर गुरुकूल प्रमुख बाबासाहेब आंधळे हे वाहक होते. शाळेच्या मुख्याध्यापिका कुसुम चौधरी म्हणाल्या की, कन्या विद्यालय हे गुणवत्तेमध्ये जामखेड तालुक्यात एक नंबरचे विद्यालय आहे. विद्यार्थी संख्या, शिस्त, टापटीत याबाबत ही विद्यालय उत्तम आहे. सांगायला आनंद वाटतो की,या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल ९७.९६ टक्के लागलेला आहे तर मुली ९०% पेक्षा पुढे उत्तीर्ण झालेल्या आहेत. ही सोपी गोष्ट नाही. पण ते कन्या विद्यालयाने करून दाखविले आहे. विद्यालयाचा निकाल नेहमीच सर्वोत्तम लागलेला आहे आणि हीच ऊर्जा घेऊन आपल्याला याही वर्षी हीच गुणवत्ता टिकवण्यासाठी काम करायचे आहे. यावेळी इयत्ता पाचवीच्या मुलींना शाळेच्या गेटपासून सजवलेल्या बैलगाडीतून कार्यक्रमस्थळी आणत त्यांचे गुलाबपुष्प व पुस्तके देऊन भव्य असे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका के.डी .चौधरी यांनी केले व सुत्रसंचलन संतोष सरसमकर तर आभार प्रदर्शन शंभूनाथ बडे यांनी मानले.

# वारकरी दिंड्याना वीस हजार रुपयांचे अनुदान

### वारकऱ्यांच्या मागणीनुसार दौंडचा प्रस्तावित कत्तलखाना रद्द, वारकऱ्यांना अपघात गटविमा, वाहनांना टोल माफी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्यांना २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल, अशी घोषणा केली आहे. यंदाची आषाढी वारी स्वच्छ, निर्मल आणि सुरक्षित व्हावी यासाठी शासन सर्वतोपरी नियोजन करत असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. पंढरपुर तीर्थक्षेत्र आषाढी एकादशी वारी पालखी सोहळा पुर्व नियोजनासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सह्याद्री राज्य अथितीगृह येथे विशेष बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.**

बैठकीत वारकरी संप्रदायाच्या प्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दौंड येथील भीमा नदी काठी होणारा कत्तलखाना रद्द करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले. या निर्णयाचे बैठकीतच समस्त वारकरी संप्रदायाने टाळ्यांनी आणि हरिनामाच्या गजरात स्वागत केले. आषाढी वारीसाठी वारकऱ्यांसाठी गटविमा योजना लागू करण्याची, तसेच वारकऱ्यांच्या वाहनांना गतवर्षीप्रमाणेच टोल माफी देण्यात येईल, असेही जाहीर केले. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, मुख्य सचिव नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, तसेच वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ बंडातात्या कराडकर, अक्षयमहाराज भोसले, श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या विश्वस्त ॲड. माधवी निगडे-देसाई, यांच्यासह मानाच्या दहा पालख्यांचे प्रमुख उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आषाढी वारीसाठी गतवर्षी पंढरपुरात भेट देऊन, पाहणी करून तयारी केली होती. यंदाही चांगले नियोजन करून, आषाढ वारी स्वच्छ, निर्मल आणि सुरक्षित व्हावी यासाठी शासनाच्या सर्वच विभागांनी चांगली तयारी केली आहे. विशेषतः अपघात टाळण्यासाठी गृह विभागाला नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. वारीच्या नियोजनासाठी गतवर्षीप्रमाणेच मंत्रालयातून नोडल अधिकाऱ्यांची नियुक्त केली गेली आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही वारकऱ्यांच्या सुरक्षेबाबत गृह विभागाने आवश्यक त्या गोष्टीची वेळीच दखल घेऊन पुरेपूर तयारी करण्याचे निर्देश या बैठकीत दिले.

### विधानसभेच्या मतांसाठी घोषणा?

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकांमध्ये महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुतीतील भाजपा, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एक ते दिड टक्का मतदान कमी झाल्याची माहिती भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यानंतरआगामी विधानसभा निवडणूकीला अद्याप तीन ते चार महिन्यांचा अवकाश असला तरी कमी झालेल्या मतांची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्यांना भावनिकरित्या खुष करण्यासाठी आणि वारकरी संप्रदायाची ५ ते ७ लाख मते मिळविण्यासाठी दिंड्यांना वीस हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल, अशी घोषणा केली असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

## दु:खाचे निरसन फक्त संतच करू शकतात-ह.भ.प माधव महाराज डाके

**बीड । प्रतिनिधी**

**या भूतलावरील अज्ञानी जन जड जीवांचा उद्धार आणि कल्याण हे फक्त संतच करतात .मनुष्य प्राण्यास आपले जीवन जगत असताना येणाऱ्या अनंत अडचनी व दु:ख यापासून मार्ग काढण्याचा मार्ग फक्त संतच दाखवू शकतात. असे मौलिक विचार काल पेठ बीड येथील विठ्ठल मंदिर संस्थान येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण व नाम सप्ताह मध्ये आपल्या कीर्तनरुपी सेवेच्या वेळी ह भ प माधव महाराजांनी हे भावउद्गार काढले.**

ह.भ.प माधव महाराज डाके काठवडेकर यांनी या कीर्तन सेवेसाठी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा तुम्ही संत मायबाप कृपावंत काय मी पतीत कीर्ती वानू हा जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या या गोड अभंगावर चिंतन मांडले. महाराजांनी आपल्या जीवनात संताचे किती उपकार आहेत हे विशद केले. या अभंगावर निरुपण करताना महाराजांनी आपला जीव अर्थात आत्मा हा अमर आहे, तो कुठल्याही नैसर्गिक आपत्तीने नष्ट होत नाही, तो अमरच राहतो.आपण कोण आहोत हे कळणे म्हणजे ज्ञान प्राप्त होणे आहे .आणि हे ज्ञान देण्याचे मोठे कार्य आपणास संत करतात संताच्या संगतीत आलं की आपण कोण आहोत आणि या मृत्युलोकी का आलो आहोत याचा उलगडा झाल्याशिवाय राहत नाही. मनुष्य जीवनामध्ये संत संगत महत्त्वाची आहे .या भवसागरातून आपण तरले जाऊ शकतो असे महाराजांनी या प्रसंगी विशद केले. ही कीर्तन सेवा श्रवण करण्यासाठी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .शेवटी ह भ प एकनाथ महाराज पुजारी यांनी हभप माधव महाराज डाके यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सन्मान केला.

# कवडगाव ते चाकरवाडी पायी दिंडी सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

२० व्या शतकातील संत महान विभूती वैकुंवासी ज्ञानेश्वर माऊली दादा चाकरवाडीकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त गेल्या अठरा वर्षांपासून चालत असलेली अखंड कवडगाव ते चाकरवाडी पायी दिंडी सोहळा यावर्षीही मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये दिनांक १६/ ६/ २०२४ रविवारी सकाळी दहा वाजता ग्रामदैवत बजरंग बली यांचे दर्शन घेऊन व ग्राम प्रदक्षिणा करून दिंडी मार्गक्रम करणार आहे.

या दिंडीचा पहिला मुक्काम श्री संत भगवान बाबा मंदिर वडवणी येथे होईल या ठिकाणी रात्री हरिकीर्तन व जागरण भजनाचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक १७/ ६ २४ रोजी सकाळी वडवणी मधून दिंडीचे प्रस्थान खडकी कडे होणार आहे खडकी मुक्कामी सर्व भाविक भक्तांचा हरी जागर होणार आहे १८/ ६ २०२४ रोजी दिंडी कोरडेवाडी मुक्कामी असेल या ठिकाणचा मुक्काम झाल्यानंतर १९ /६/ २०२४ रोजी देवगाव यथे मुक्कामाला येईल. या ठिकाणी गावकऱ्यामार्फत पंगत होणार आहे तसेच रात्री हरी कीर्तन व जागर संपन्न होणार आहे. दिनांक २० /६ /२०२४ रोजी या पायी दिंडी सोहळ्याचे आगमन श्री क्षेत्र चाकरवाडी या ठिकाणी होणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे २१ /६ /२०२४ ज्येष्ठ शुद्ध १४शुक्रवारी रोजी पायी दिंडी संपूर्ण चाकरवाडी क्षेत्राला ग्रामप्रदर्शना करून दिंडी माऊली महाराज यांच्या सभामंडपामध्ये काल्याचे कीर्तन श्रवण करण्यासाठी सामील होईल काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद घेऊन दिंडीचा समारोप होणार आहे . या चाकरवाडी च्या पायी दिंडी सोहळ्यामध्ये सर्वांनी जास्तीत जास्त भावीक भक्तांनी व माऊली भक्तांनी सहभागी होऊन पायी दिंडी सोहळ्याचा आनंद तसेच नाम जपाचा महिमा व महान संत माऊली दादा चाकरवाडीकर यांच्या दर्शनाचा आलभ्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, तसेच भजनी मंडळ, व माऊली भक्त कवडगाव यांनी केले आहे.

## मिल्लीया गर्ल्स शाळेत पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

येथील नामांकित मुलींची माध्यमिक शाळा मिल्लीया गर्ल्स हाई स्कूल व ज्युनियर कॉलेज येथे १५ जुन पासून शाळा सुरु झाल्या व शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व ५ वी ते ८ वी च्या मुलीना नविन पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक



ईरफान सिध्दीखी उपमुख्याध्यापक खुर्शिद अहमद सुपरवायझर नसरीन फराना व शाळेतील सर्वच शिक्षक उपस्थित होते. व मोठ्या संख्येने सर्वच वर्गाच्या विद्यार्थीनीही उपस्थित होत्या.

पान १वरून...

### जून अखेरपर्यंत ७५ टक्के

करावा. प्रत्येक तालुक्यात किमान तीन भरारी पथके नेमावेत आणि त्यांनी दररोज किमान २५ दुकानांना रँडम पद्धतीने भेटी द्याव्यात. परभणी आणि यवतमाळ येथे खतांच्या बाबतीत तुटवडा असेल तर त्यावर उपाययोजना करून तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना मंत्री मुंडे यांनी दिल्या. प्रत्येक जिल्ह्यात पोलीस दलामार्फत किमान एक उपविभागीय पोलीस अधिकारी कृषी विभागासाठी समन्वयक म्हणून नेमावेत व त्यांनी पूर्णवेळ या कामाचे पोलीस सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सांभाळावी, अशा सूचना जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांना केल्या. सोयाबीनच्या उगवण क्षमतेबाबत आतापासूनच जनजागृती करुन शेतकऱ्यांना घरच्या घरी उगवण क्षमता तपासणी करण्याबाबत मोहिम राबवावी तसेच खतांचे नमूने वेळोवेळी तपासले जावेत अशा सूचना मुंडे यांनी यावेळी दिल्या.

------------

### संघानंतर शरद पवारांचे

त्यामुळे आणखी दोन-तीन महिन्यांनी लोकांच्या समोर जायची संधी मिळेल, तेव्हा लोक पूर्ण विचार करुन ठोस निर्णय घेतील. कांदा उत्पादन करणारा शेतकरी नाराज होता. आजही काही बदल त्यात झाला असा वाटतही, असे शरद पवार यांनी म्हटले. उद्धव ठाकरे म्हणाले, इंडिया आघाडीला मतं दिली तर तुमची संपत्ती जास्त मुलं होणाऱ्यांना वाटतील. तुमचे मंगळसूत्र काढून घेतली. तुमच्या घरातील नळ कापून नेतील, वीज कापतील हे काय खरं नेरेटीव्ह होतं का, असा प्रतिसवाल उद्धव ठाकरेंनी विचारला. गेल्या काही दिवसांपासून एनडीएकडून संविधान बदलणार हे खोटे नॅरेटिव्ह इंडिया आघाडीकडून चालवण्यात आले, असा आरोप करण्यात येत होता. त्याला उद्धव ठाकरेंनी प्रत्युत्तर दिले आहे.

------------

### हिजाब बंदीविरोधात मुंबईतील ९ मुलींनी

यामुळे कधीही कोणत्याही प्रकारची समस्या आली नाही. याशिवाय वर्गात असाता विद्यार्थ्यांना टिकली, टिळा, मनगटाभोवती धार्मिक धागे, राखी आणि बोटांमध्ये अंगठ्या घालण्यास परवानगी आहे. पण आम्हाला हिजाब घालण्यास परवानगी नाही. अशा प्रकारे, निवडक लोकांवर निर्बंध लादणे हे भेदभाव करणारे, बेकायदेशीर आणि कायद्याच्या विरुद्ध आहे. उच्च न्यायालयाच्या वेबसाइटनुसार, वकील अल्ताफ खान यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेवर विभागीय खंडपीठात सुनावणी होणार आहे. महाविद्यालयाने अलीकडेच त्यांच्या वेबसाइट आणि व्हॉट्सॲपद्वारे विद्यार्थ्यांना नोटीस जारी केली आहे, ज्यामध्ये बुरखा, निकाब, हिजाब, टोपी, बॅज आणि स्टोल्स घालण्यास बंदी घालण्यात आली आहे.

-------------

### नरेंद्र मोदींनी तयार

जनतेने लोकशाही आणि राज्यघटना वाचविली. केंद्रातील भाजपा सरकारला एकप्रकारे लगाम लावण्याचा काम महाराष्ट्रासह देशातील जनतेने या लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने केले. ज्या युती, आघाडीच्या सरकारला मोदी हे नावं ठेवत होते. आज त्याच आघाडीच्या अर्थात एनडीएच्या सरकारचे ते नेतृत्व करत आहेत. आता त्यांना एनडीएची आठवण झाली. यापूर्वी कधी त्यांना एनडीएची आठवण झाली नाही. अमित शाह यापूर्वी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांना काय बोलले होते, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याबद्दल काय बोलले होते, आता या दोघांसाठी दारे बंद मग आता कशी उघडली गेली असा सवालही यावेळी केला. तसेच उद्धव ठाकरे म्हणाले की, केंद्रात आता भाजपाचे नव्हे तर एनडीएचे सरकार स्थानापन्न झाले आहे. मात्र हे सरकार किती दिवस टीकेल हे कोणीही सांगू शकत नाही. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, भाजपाने यापूर्वी घोषणा दिली होती की आम्हाला काँग्रेसमुक्त आणि विरोधकमुक्त भारत निर्माण करायचा आहे. मात्र मी नाशिक येथील काळाराम मंदिरात गेलो होतो, त्यावेळी म्हणालो होतो की, आम्हाला भाजपा मुक्त राम करायचा आहे. त्यामुळेच उत्तर प्रदेश आणि अयोध्येत भाजपाने आमच्या समाजवादी पक्षाकडून सपाटून मार खाल्ला, भाजपाच्या उमेदवारांचा मोठ्या संख्येने पराभव झाल्याचेही यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले.

**मी पंतप्रधान मोदींचे आभार मानतो - शरद पवार**

महाराष्ट्राच्या जनतेने लोकसभा निवडणुकीत भाजपला नाकारले आहे. तरीही त्यांना शहाणपण आलेले नाही. सत्तेचा सरळ-सरळ गैरवापर केला जात आहे. येणाऱ्या तीन चार महिन्यानंतर जनता त्यांना उत्तर देईल, अशा शब्दांमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबा केला. ''जेथे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रोड शो केला किंवा जेथे जाहीर सभा घेतली तिथे आम्ही जिंकलो. त्यामुळे पंतप्रधानांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.'', असा टोलाही यावेळी शरद पवारांनी लगावला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने भाजपला नाकारले आहे. आता पुढील विधानसभा निवडणुकीत जनताच त्यांना पुन्हा उत्तर देईल, असा दावा करत देशात जातीय जनगणना करण्यावर आमच्यामध्ये एकमत आहे, असेही पवारांनी यावेळी सांगितले.

**महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन होणार - पृथ्वीराज चव्हाण**

यावेळी काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण काँग्रेसची भूमिका मांडताना म्हणाले की, यापुढील सर्व निवडणूका आम्ही महाविकास आघाडी म्हणूनच लढणार आहोत. आगामी विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर आमच्या तिन्ही पक्षांची एक बैठक झाली आहे. आता आणखी अन्य काही पक्ष आघाडीत येण्यास इच्छुक आहेत. महाराष्ट्रातील जनतेने एमव्हीएच्या उमेदवारांना विजयी केले आहे. लोकसभे प्रमाणे विधानसभा निवडणुकीतही जनतेचे प्रेम मिळेल आणि महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन होणार आहे, असे ते म्हणाले.

**विधानसभेतही आघाडी कायम...**

उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, आगामी विधानसभा निवडूणकीतही आम्ही महाविकास आघाडी म्हणून सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यासंदर्भातील एक बैठक आमची झाली आहे. याशिवाय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासह अन्य काही छोटे मोठे पक्ष आमच्या आघाडीत सहभागी होत असल्याचेही ते म्हगाले. विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातही आम्ही आघाडी म्हणूनच सामोरे जात आहोत. कोकणातील काँग्रेसच्या उमेदवाराला आम्ही पाठिंबा दिला असून, मुंबई आणि नाशिकमधील जागेसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने आम्हाला पाठिंबा दिला असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

---------------

### पालकमंत्री धनुभाऊंनी

बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडेंनी या पोपटराव वायभासे तरुणाच्या घरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच, पीडित कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही त्यांनी उचलली. लोकसभा निवडणुकीच्या निकालात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव झाल्याच्या दुःखात आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी गावच्या पोपटराव वायभासे या तरुणाने आत्महत्या केली होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज वायभासे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. निवडणुकांमध्ये जय -पराजय होत असतात मात्र या विवंचनेतून कोणी आपला जीव गमवावा, ही आमच्या मनात अपराधीपणाची भावना उत्पन्न करणारी बाब आहे. कुटुंबासाठी देखील हे कधीही न भरून निघणारे मोठे दुःख आहे, त्यामुळे संयमाने जय-पराजय घ्यावेत. कोणतीही निवडणूक अंतिम नसते. कुणीही टोकाचा निर्णय घेऊ नये, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी भावना व्यक्त केल्या. तसेच, पीडीत वायभासे कुटुंबीयांचे सांत्वनही केले.

-----------------

### एकनाथ खडसे अन् गिरीश

स्वीकारल्यानंतर आज प्रथमच रक्षा खडसे रावेर मतदारसंघात दाखल झाल्या. यावेळी कार्यकर्त्यांकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पत्रकारांशी संवाद साधताना रक्षा खडसे यांनी एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबाबत आणि गिरीश महाजन-एकनाथ खडसे यांच्या वादाबाबत महत्वाचे भाष्य केले आहे. एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबाबत विचारले असता रक्षा खडसे म्हणाल्या की, नाथाभाऊ हे मोठे नेते आहेत. त्यांच्या प्रवेशासंदर्भात आमचे केंद्राचे आणि राज्याचे वरिष्ठ नेते लवकरच निर्णय घेतील. योग्य वेळी नाथाभाऊंचा प्रवेश होईल, असा विश्वास रक्षा खडसे यांनी व्यक्त केला आहे. एकनाथ खडसे अन् गिरीश महाजन एकत्र येणार का? असे विचारले असता रक्षा खडसे म्हणाल्या की, माझी इच्छा आहे की, भारतीय जनता पार्टीसोबत जेवढे लोक जोडतील. तेवढी आमच्या पक्षाची ताकद वाढेल. नाथाभाऊ हे भाजपमधील खूप जुने नेते आहेत. त्यामुळे गिरीश भाऊ आणि नाथाभाऊ यांनी एकत्र येऊन काम केले तर जिल्ह्याच्या विकासासाठी चांगलेच आहे. नाथाभाऊ आणि गिरीश भाऊ यांना एकत्र आणण्यासाठी मी नक्कीच प्रयत्न करेन, असे मंत्री रक्षा खडसे म्हणाल्या.

------------------

### एमएचटी सीईटीचा

प्रवेशासाठी सीईटी सेलकडून दरवर्षी प्रवेश परीक्षा घेतली जाते. त्या गुणांच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश केले जातात.

--------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि.१६ जून २०२४



## जयदत्त आण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा -सोनवणे

बीड । प्रतीनिधी

मा. जयदत्त आण्णा यांच्या नेतृत्वाखालील हा कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडत आहे ह्या मेळाव्यात अनेक जन नावलोकीक कार्यकर्ते मा. जयदत्त आण्णा गटात प्रवेश व बर्याच संघटना जाहिर पाठिंबा देणार आहेत जिल्ह्याच्या राजकारणात मा. आण्णाच नाव मोठ्या प्रमाणात आहे विस वर्षे मंत्री पदे आणि विस वर्षे आमदारकी आसा प्रवास आहे पन आता जिल्ह्यातील कार्यकर्तेनचा कल जयदत्त आण्णा कडे जास्त आहे आताच नुकत्याच पार पडलेल्या लोक सभा निवडणूकी नंतर आता त्या पाठोपाठ विधानसभा निवडणूक पार पडत आहे त्या आण्णा आतापर्यंत कोणत्याच पक्षात नव्हते पण १६ तारखेच्या मेळाव्याची धास्ती आख्या जिल्ह्याला लागली आहे की आण्णा कोनत्या पक्षात जाणार आहेत आतापर्यंत गुपित होते आता मेळाव्यानंतर ते बीड जिल्हाच्या जनते समोर येईल असे वर्तवले जात आहे आण्णा अभ्यासू व विकासपूरुष व्यक्तीमत्व आहे बीड शहराचा आता पर्यंत चा विकास फक्त आण्णा मुळे झालेला आहे असे नागरिक कांचे म्हणे आहे.

# युवकांनो सोशल मिडियाचा वापर जरा जपूनच करा

## अन्यथा करिअर होऊ शकते खराब; तर वापरकर्त्यांना जेलची हवा खाण्याचीही दाट शक्यता?

ज्योतीराम पांढरपोटे /माजलगाव:- सध्याच्या काळात प्रत्येकजण स्मार्ट व हुशारीपणा दाखवण्यासाठी सोशल मीडियावर व्यक्त होताना दिसतात.त्यात इकडे-तिकडचे मेसेज फॉरवर्ड करण्यात अनेकांचा हातखंडा आहे. त्यात धार्मिक, राजकीय,जातिय, देशविरोधी या विषयांवर तर सेकंदात हे वापरकर्ते व्यक्त होतात.मात्र या मीडियाचा वापर दक्षता बाळगुन न केल्यास व कोणत्याही पोस्टला लाईक,शेअर आणि फॉरवर्ड केल्यास सोशल मिडीया चालकांच्या चांगलेच अंगलट येऊन 'करिअर खराब' होऊ शकते परिणामी'जेल ची हवा' खाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे युवकांनी सोशल मिडियाचा वापर करताना जरा जपूनच करा असं म्हणण्याची आता वेळ आली आहे.

सध्या राज्यातील लोकसभा निवडणुकीचा निकाल नुकताच लागलेला असुन या दरम्यान लोकसमेला पराभुत झालेल्या उमेदवारां बाबत अथवा विविध जातीय, धार्मिक, हिंदू-मुस्लिम,मराठा, ओबीसी आरक्षणांच्या मुद्यांवर भडकाऊ भाषणे करून युवकांची माथी भडकवण्यासठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विशेष आयटीच्या छुप्या सायबर टिम कार्यरत असुन, त्यांच्याकडुन विविध जातीधर्माच्या विरोधात बदनामीकारक मेसेसे तयार करणे तसेच नेते मंडळींच्या विरोधात आक्रमक पवित्रा निर्माण होईल असे मेसेज बनवून व्हायरल केले जातात.त्यावर कोणताही विचार न करता व मेसेजची खात्री न करता त्यावर तातडीने प्रतिक्रिया देत ते शेअर करत आपण सर्वांपेक्षा किती अपडेट व हुशार आहोत हा दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न युवकांकडून केला जातो.परंतु या सोशल मीडियावर काही समाजभान नसलेले आणि विघ्नसंतोषी लोकांचाही मोठा भरणा असल्याने, ही मंडळी जहाल, तीव्र,भडक, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या,शांतता भंग करणाऱ्या, वात्रट पोस्टच शेअर करण्यावर अधिक भर देतात.यातील एकही पोस्ट तुमच्याकडून चुकून नकळत अनावधानाने असो की भावनेच्या भरात शेअर केली जाते अन्? त्यामुळे समाजात जातीय तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असते. सध्या सोशल मीडियाच्या या जगात पोस्ट, लाइक्सची चढाओढ आहे.त्या नादात चुकीची माहिती शेअर होणे असे प्रकार होतात. आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे;परंतु येथे व्यक्त होताना त्याच्या परिणामांचा विचार केला जात नाही.त्यातून अफवा पसरतात,गैरसमज होतात.सोशल मीडियाचा वापर विधायक कामांसाठी केला, तर तो नक्कीच चांगला आहे; मात्र त्यातून अनेकदा विध्वंसक कृत्येही केली जातात. त्यामुळे सोशल मिडियावर आलेल्या पोस्टची खात्री करूनच ते लाइक्स कमेंट्स व फॉरवर्ड करावे अन्यथा, अतिघाई संकटात नेई म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.







### माहिती फॉरवर्ड करताना घ्या काळजी

एखाद्या कुणाची बदनामीकारक, धार्मिक भावना दुखावणारा,कायदा सुव्यवस्था धोक्यात आणणारा मेसेज जर तुम्हाला आला असेल आणि तोच मेसेच तुम्ही इतरांना पाठवल्यास तो सायबर क्राइमनुसार गुन्हा आहे.त्यामुळे पाठवणारा आणि तो मेसेज आणखी इतरांना पाठवणारासुद्धा दोषी असल्यामुळे त्याच्याविरुद्ध सुद्धा गुन्हा दाखल होऊ शकतो.

### “ पोस्ट करताना घ्या काळजी

सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक गुन्हे घडत आहेत. त्यामुळे व्हॉट्सअप, ट्विटर, इन्स्टाग्राम व फेसबुकवर या सोशल मीडियावर संवेदनशील माहिती टाकल्यास अथवा ती शेअर केल्यास संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल होऊ शकतो.सोशल मीडियावरील कोणत्याही प्रकारचे धार्मिक भावना दुखावतील,तसेच वादग्रस्त पोस्ट वापरकर्त्यांनी करू नये.कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता,आपण अथवा जवळचे कोणीही त्यात सहभागी होऊ नये याची खबरदारी घ्यावी.सोशल मीडियाचा वापर योग्य ती दक्षता बाळगुनच करावा. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे मेसेज फॉरवर्ड करू नये.वादग्रस्त पोस्टकडे पोलिसांचे लक्ष असुन,अशा घटना निदर्शनास येताच वापरकर्त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

-केतन राठोड, पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर पोलीस ठाणे

## दिंद्रुड, देवदहिफळ केंद्रातील विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून,फेरी काढून स्वागत

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड पंचक्रोशीत माजलगाव व धारूर तालुक्यातील अनेक गाव, खेडे, वाड्या-वस्त्या येतात. येथील परिसरात जिल्हा परिषद शाळेचे चे दिंद्रुड व श्रीक्षेत्र देवदहिफळ अशी दोन केंद्र असून, अनेक जि. प. शाळा व वस्ती शाळा आहेत. दिंद्रुड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या-मुलांची) शाळेसह काही शाळांमध्ये केवळ पाठ्यपुस्तके देण्यात आली, दोन्ही केंद्रातील बहुतांश शाळांमध्ये पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. तर काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तके दिले मात्र कोणत्याही पद्धतीने स्वागत करण्यात आले नाही.

२०२४-२५ या नवीन शैक्षणिक वर्षास काल शनिवार (दि१५) पासून सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव संबंधित प्रशासन वेगवेगळ्या पद्धतीने स्वागत करून साजरा करणार होता. मात्र या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी दिंद्रुड परिसरातील बोटावर मोजण्या इतक्या शाळांमध्ये उत्सुकता तर काही शाळांची उदासीनता दिसून आली. केवळ पाठ्यपुस्तके वाटप करून हाफ डे असल्यामुळे अर्ध्या दिवसावर शाळा सोडून देण्यात आली. यावरून काही शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात निरुत्साह दिसून आला. दिंद्रुड व देवदहिफळ केंद्रातील नाखलगाव, चाटगाव च्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देत 'माझी शाळा, जिल्हा परिषद शाळा' आदी घोषणा देत गावातून फेरी काढण्यात आली. मात्र काही जि. प. शाळांची विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास उदासीनता आढळली. शिक्षकांच्या या निरुत्साही पणामुळे जिल्हा परिषद शाळेत पटसंख्या वाढत नसल्याचे परिसरात बोलले जात आहे.




## चिंचेवाडीला आत्महत्याग्रस्त वायभसे कुटुंबाची जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांची भेट



आष्टी । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा झालेला निसटता पराभव जिव्हारी लागल्याने मुंडे समर्थक एका तरूणाने गळफास घेऊन जिवन संपवल्याची घटना मंगळवारी रात्री बारा वाजेच्या दरम्यान घडली. पोपट वायभासे असे मृत तरूणाचे नाव होते.

आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी येथील पोपट मधुकर वायभासे (३७) हा तरूण मुंडे समर्थक आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागला. पराभव झाल्यापासून तो सारखा विचारात गेला होता. मंगळवारी रात्री त्याने कोणाला काही एक न बोलता चिंचेवाडी शिवारात जाऊन एका झाडाला गळफास घेऊन जिवन संपवल्याची घटना घडली होती या कुटुंबाची जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी शुक्रवार दि.१४.०६.२०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता भेट घेऊन सांत्वन करुन पुढील काळात काही अडचणी आल्यास सदैव तत्पर राहिल असे यावेळी कुटुंबाला सांगितले व तरुणांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलु नये असे वायभासे कुटुंबाच्या सांत्वन भेटी दरम्यान बाळासाहेब सानप यांनी भावना व्यक्त केल्या.

पान ६ वरून...

### विज वितरण कंपनीने गाव

विलगीकरण तसेच जुन्या तारा बदलणे, रोहित्र बदलणे या नियमित कामासह दुष्काळ सदृश्य स्थितीत दिला गेलेला लाभ व कृषी वीज पुरवठ्यासाठी जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या तरतुतीतील कामांचा आढावा घेण्यात आला.शेतकऱ्यांना दिवसा आठ तास व रात्री दहा तास विद्युत पुरवठ्याचे लक्ष समोर ठेवून सर्व कामांना गती देण्यात येईल. यासह चारा डेपो सुरू करणे, पाणी पुरवठा यांचाही समग्र आढावा घेण्यात आला.शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या गाव फिडर योजनेची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे अशी सुचनाही या बैठकीत आ.प्रकाश सोळंके यांनी केली.

### रेवली गावात एचआयव्ही

या शिबिरात एकूण ७३ गावकऱ्यांची एच आय व्ही तपासणी करण्यात आली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी लिंक वर्कर प्रकल्पाच्या पियर लता आघाव, शाहीन मॅडम व गावच्या सरपंच रेखा मनोहर केदार, माजी सरपंच मनोहर बाबुराव केदार, आशा वर्कर मनीषा दळवे, संगीता तरकसे यांनी अथक परिश्रम घेतले.

### वॉशिंग मशीनने घेतला

होते, तेवढ्यात त्यांचं लक्ष बाथरूम कडे जाते, आत मध्ये पाहिलं तर सर्वांच्या पाया खालची वाळू सरकते, आकाशात वीज कडकडावी ती आपल्या अंगावर कोसळावी या प्रमाणे ऍड जयसिंग चव्हाण व त्यांच्या परिवारावर एक प्रकारे विजच कोसळली, समोरच दृश्य पाहून दोघेही जागेवर कोसळले कारण समोरच दृश्य ही तसच होत, त्यांचा लाडका उदय सिंग वॉशिंग मशीन मंध्ये डोके खाली घालून पडला होता, आणि त्यात पाणी असल्याने तो जागीच हे जग सोडून गेला होता. एकूणच या ठिकानचे भयावह चित्र पाहता लक्षात आलं की तो खेळत आसतांना त्याची खेळणी त्या वॉशिंग मशीन मधील पाण्यात पडली, बाथरूम मधील स्टूल वरती उभा राहून तो वॉशिंग मशीन मध्ये डोकावू लगला, खेळणी हाताला येत नाही म्हणून तो या मशिन मध्ये वाकला आणि त्याचं मुंडक पाण्यात गेलं, तो उलटा झाला, त्याला ना ओरडता आलं ना, परत पलटून खाली येता आलं, पाण्यात गुदमरून त्याचा जीव त्याच ठिकाणी गेला होता. आपल्याला ऐकल्या नंतर जर एवढे शहारे येत असतील तर आपल्या पोटच्या गोळ्याला तशा अवस्थेत पाहून ऍड जयसिंग चव्हाण व त्यांच्या पत्नीची अवस्था काय झाली असेल याची कल्पना ही न केलेली बरी. गुरुवारी रात्रीतून हे वृत्त वाऱ्या सारखे सर्वत्र पसरले, आज सर्वत्र हळहळ होतेय, शहर परिसरात एकच चर्चेचा आणि हळहळीचा विषय आहे तो म्हणजे आज तागायत कुठेही न ऐकण्यात आलेला असा उदयसिंग या चिमुकल्याचा वॉशिंग मशीन मध्ये पडून झालेला दुर्देवी मृत्यु. शुक्रवारी सकाळी अत्यंत शोकाकुल अवस्थेत अंबाजोगाई तालुक्यातील हातोला या ठिकाणी उदयसिंगला शेवटचा निरोप देण्यात आला.

### ॲड. महादेव तुपे यांच्या मुलाचा

ॲड. सुरेशराव हात्ते, गरवारे महाविद्यालय, पुणे येथील प्रा. डॉ. विनोदजी ढगे, प्रा. डॉ. नानासाहेब गवारे, न.प. सदस्य सुनिल अनभुले, ॲड. हेमाताई पिंपळे, सुभाषराव पवळ, महादेवराव काळे, प्रल्हादराव झिरपे, संभाजी पवळ, रावसाहेब रकटे, मा.पं.स. शंकरराव डोंगरे, समर्थ बँक जालना उपाध्यक्ष संजय कणके, प. सं. सदस्य परमेश्वर खरात, चंद्रकांत नवले, डॉ बाळासाहेब पिंगळे, अशोक सुखवसे, जेष्ठ नेते प्रकाशराव सुसकर, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड.पी.एस राजापुरकर मा. जिल्हा सरकारी वकील कृष्णराव पंडीत, ॲड. लक्ष्मणराव करांडे, ता. निबंधक राधाकिसन मोटे सह निबंधक सिध्देश्वर सांगुळे, सखाराम मस्के, ह.भ.प सतेंद्र डाके, प्रा. सतिष चव्हाण, डॉ. अविनाश पौळ, प.सं. सदस्य महादेव औटी, सिध्देश्वर आर्सुळ, माजलगांव वकील संघाचे अध्यक्ष ॲड. गोंडे, गेवराईचे ॲड. स्वप्नील येवले, इंजि. अमोल लोणकर, कांतराव सुरवसे फौजी, अशोकराव गोरे, तसेच नातेवाईक, पाहुणे मंडळी, मित्र परिवार मोठ्या संख्येने आशिर्वाद देण्याकरीता उपस्थित होते .या संपुर्ण सोहळ्याचे बहारदार सुत्र संचालन प्रसिध्द निवेदक महादेव चाटे सर यांनी केले.

## आवरगावचे माजी सरपंच प्रकाशराव नखाते यांचे निधन

धारूर । प्रतिनिधी

आवरगावचे माजी सरपंच प्रकाशराव नामदेवराव नखाते यांचे शनिवारी सकाळी दहा वाजता राहत्या घरी दुःखद निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते, त्यांचा स्वभाव मनमिळाऊ आणि सर्वांना पुढे घेऊन जाणारा होता, त्यांनी आपल्या सरपंच पदाच्या काळात अनेक कामे केलेली आहेत, त्यामुळे त्यांच्या दुःखद निधनाने धारूर परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे, आज दुपारी एक वाजता आवरगाव येथील शेतात अंत्यविधी केला जाणार आहे, त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे.



## गुलाबपुष्प नको निदान धड चालता येईल असा रस्ता तरी द्या- डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व शाळा आज दि.१५ जुन पासुन सुरु झाल्या आहेत.शाळेचा प्रारंभ हा चैतन्यमय व उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळावी यासाठी यासाठी शाळेमध्ये नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाकडून मिठाई, पुष्पगुच्छ वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र बीड तालुक्यातील कामखेडा गावातील शिंदेवस्तीवरील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी चिखल तुडवीत शाळेत जावे लागत आहे. कामखेडा गावापासून अर्धा किलोमीटर अंतरावरील जवळपास ५० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांनी रस्ता मिळावा यासाठी २-३ वर्षांपासून जिल्हा प्रशासन दरबारी निवेदने देऊन सुद्धा अद्याप कोणतीही उपाययोजना न केल्याने एकंदरीतच शिक्षणाची केवळ कोट्यवधींचा खर्च करून जाहिरात बाजी करणा-या जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन संबंधित प्रकरणात विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करून रस्त्यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत शिक्षणमंत्री, महिला व बाल कल्याण मंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदनाद्वारे केली आहे.



दरवर्षी पावसाळ्यात पाणंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साठते.जास्त पाऊस झाल्यास मुलांना शाळा बुडवावी लागते. पाण्यामुळे तसेच साप विंचु आदिमुळे मुलांना शाळेत जाताना भिती वाटते.दुपारी शेतातील कामं सोडून मुलांना घरी आणण्यासाठी यावं लागतं.आमच्या लेकरांच्या शिक्षणिसाठी शासनाने आमची रस्त्याची अडचण दुर करावी.

शाळा प्रवेशोत्सव निमित्त भेटी देणारे उप शिक्षणाधिकारी माजेद काझी शिंदेवस्ती मुलांच्या व्यथा जाणून घेतली काय?? :- डॉ.गणेश ढवळे

नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या उत्साहात व आनंदाने करणे आवश्यक असुन शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करत विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन करण्याच्या सुचना शिक्षण विभागाने दिलेल्या आहेत.या अनुषंगाने जिल्हा स्तरावरून तालुक्यांना भेटी देण्यासाठी आधिका-यांची नियुक्ती करण्यात आली असुन बीड तालुक्यासाठी उपशिक्षणाधिकारी माजेद काझी यांची निवड करण्यात आली असुन ते कामखेडा गावातील शिंदे वस्ती वरील विद्यार्थ्यांच्या व्यथा जाणून घेतील काय? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

# बौद्ध धम्मात जात ही संकल्पना नाही:राजरत्न आंबेडकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपल्या मुलांच्या शाळा प्रवेश घेताना जात लिहू नका फक्त बौद्धच लिहा कारण बौद्ध धम्मात जात ही संकल्पना नाही. महार ही जात आपण यापूर्वीच त्यागली असून बौद्ध धम्म स्वीकारला आहे. त्यामुळे फक्त बौद्धच लिहाअसे प्रतिपादन राजरत्न आंबेडकर (राष्ट्रीय अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा)यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी, सत्यशोधक समाज महासंघ , जीवन ज्योत शि.प्र.मंडळ अंबाजोगाई यांच्या वतीने बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहरातील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात दि.११ जून रोजी दुपारी भव्य धम्मदीक्षा सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संघपीठावर या सोहळ्याचे उदघाटक राजरत्न आंबेडकर (राष्ट्रीय अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा),स्वागताध्यक्ष अडवोकेट. अनंतराव जगतकर, कार्यकमाचे अध्यक्षस्थ डी. ऐस. नरसिंगे, दिक्षा पु. भन्ते पय्यानंद थेरो,लातुर पु. भन्ते बुद्धशील, प्रमुख वक्ते सुकुमार कांबळे, निमंत्रक चंद्रशेखर वडमारे, मंगलताई कांबळे, दिनेश हणमंते,प्रा.किशोर चक्रे (भारतीय बौध्द महासभा मराठवाडा महासचिव ) ,डॉ.श्रीपती शिन्दे,वाघमारे माधव,कुमार सोनकांबळे,मोतीराम कांबळे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना राजरत्न आंबेडकर म्हणाले कि,काही लोक म्हणतात बौद्ध लिहिल्यानंतर केंद्रामध्ये आपल्याला सवलती मिळत नाहीत. आरक्षणही मिळत नाही; आरक्षण हे आपल्याला चंद्र-सूर्य आहे तोपर्यंत मिळणार नाही त्यामुळे आपण आपली लोकसंख्या वाढवण्यासाठी बौद्ध लिहिणे आवश्यक आहे.आपले कागदपत्रे बौध्द असावी. जगामध्ये शेकडो देश हे बौद्ध देश आहेत आपण जगामध्ये जाती घेऊन बाहेर पडण्यापेक्षा बौद्ध म्हणून बाहेर पडावे जग आपल्याला सहकार्य करेल,आपली अडवणूक होणार नाही.



खरा बौद्ध कोणाचीही जात विचारत नाही. जो जात विचारतो तो बौद्ध नाही. भारतातील संघर्ष हा दुसरा तिसरा काही नाही बौद्ध धम्म आणि ब्राह्मणी धर्म यांचा संघर्ष आहे. जातींचा विषय नाही. आपण ब्राह्मणी धर्मापासून रक्षण करणारे नागवंशीय लोक आहोत. एस.सी प्रवर्गामध्ये ५९ जाती असताना इतर जातीची प्रगती झाली नाही केवळ आपलीच प्रगती का होत आहे कारण आपण बौद्ध धम्म स्वीकारला आहे. त्यामुळे आपली प्रगती होत आहे व इतरांची अल्प प्रमाणात होत आहे कारण त्यांनी जुन्या चालीरीती,कर्मकांड, धर्म जोपासत असल्यामुळे प्रगती पासून दूर आहेत. या लोकसभेतील निवडणुकीमध्ये आपकी बार ४०० पार नारा त्यांनी अंगीकारला होता कारण त्यांना संविधान बदलायचे आहे. या देशातील ब्राह्मणी व्यवस्थेला बौद्ध धम्म संपवायचा आहे मागील अडीच हजार वर्षापासून आपण पाहत आहोत आपण बुद्ध धम्म स्वीकारून मूळ घरात मूळ घरात प्रवेश करतोय. मनुस्मृतीने जाती निर्माण केल्या नाहीत तर त्यांचे कामही निर्माण केलेले आहे.

असे भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पंन्तू

राजरत्न आंबेडकर यांनी अंबाजोगाई शहरातील बौद्ध धम्म दीक्षा सोहळ्यामध्ये आपले विचार मांडले.

cmyk

# खरीप हंगाम फुलणार, बळीराजा सुखावणार

## नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खरीपाची लागवड होणार

राज्याच्या विविध भागात सध्या चांगला पाऊस होत असल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळं शेती कामांना वेग आला आहे. मान्सून वेळेत दाखल झाल्याने यंदा खरीप हंगाम फुलणार आहे. दरम्यान यंदा नाशिक जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सुमारे ६ लाख २८ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावर लागवड होणार आहे. पावसानं दमदार हजेरी लावल्यानं यंदा खरीपाचा हंगाम बळीराजासाठी आशादायक ठरणार आहे.

नाशिक जिल्ह्यासाठी २ लाख २० हजार टन खतांचा साठा मंजूर : नाशिक जिल्ह्यासाठी नव्याने २ लाख २० हजार टन खतांचा साठा मंजूर झाला आहे. तर ७१ हजार २४३ क्विंटल बियाणांची मागणी करण्यात आली आहे. गतवर्षी जिल्ह्यात ६ लाख २६ हजार १९० हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पिकांची लागवड करण्यात आली आहे. यंदा मान्सून वेळेत दाखल झाल्याने खरीप हंगाम फुलणार आहे.

खरीप हंगामासाठी नाशिक जिल्ह्यात सुमारे ६ लाख २८ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावर लागवड



नाशिक जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सुमारे ६ लाख २८ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावर लागवड होणार आहे. पावसानं दमदार हजेरी लावल्याने खरिपाचा हंगाम बळीराजासाठी आशादायक ठरणार आहे. जिल्ह्याकरता नव्याने २ लाख २० हजार टन खतांचा साठा मंजूर करण्यात आला आहे. तर ७१४४३ क्विंटल बियाणांची मागणी देखील करण्यात आली आहे. गतवर्षी जिल्ह्यात ६ लाख २६ हजार १९० हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पिकांची लागवड करण्यात आली होती. यंदा पाऊस वेळेत दाखल झाल्याने पुन्हा एकदा अशा पल्लवीत झाल्या आहेत.

# कोकणात पावसाचा जोर वाढला पावसामुळे बळीराजा सुखावला



मुंबई : सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस तर काही ठिकाणी संततधार पाऊस सुरू आहे. कणकवली, कुडाळ सावंतवाडीसह जिल्ह्याच्या इतरही भागात पाऊस सुरू असून काही ठिकाणी सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. पावसामुळे हवेत चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. हवामान विभागाने आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. तसेच मुसळधार पावसाचा इशारा देखील दिला आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, रत्नागिरीतही पावसाची जोरदार बँटींग सुरु आहे. रत्नागिरीसह जिल्ह्यातील इतर भागात जोरदार पावसाच्या सरी

पावसामुळे बळीराजा सुखावला

बारामती तालुक्यातील कन्हेरी गावात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसह ग्रामस्थांची तारांबळ उडाली आहे. बुधवारी रात्री झालेल्या पावसामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरलं. त्यामुळे नागरिकांना अचानक आलेल्या पावसामुळे काय करावे आणि काय नको अशी अवस्था येथील ग्रामस्थांची झाली होती. बारामतीतील याच कन्हेरी गावात जागृत हनुमान मंदिर आहे, पवार कुटुंबीय आपल्या प्रचाराचा शुभारंभ याच मंदिरातून करत असतात.

हळद, सोयाबीनसह कापसाच्या लागवडीचे काम सुरू

पावसानंतर हिंगोली जिल्ह्यात पेरणीच्या कामांना वेग आला आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये परवा जोरदार स्वरूपाचा पाऊस झाल्यानंतर शेतामध्ये पेरणीच्या कामाला वेग आला आहे. हळद सोयाबीन कापूस या पिकांच्या लागवडीसह पेरणीचे काम शेतामध्ये सुरू आहेत. यावर्षी हळदीला चांगला भाव मिळाल्यानंतर हळदीच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हळद, कापूस आणि सोयाबीन या पिकांचे गतवर्षीपेक्षा यावर्षी क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे.

नदीला पूर आल्याने नागरिकांचा जीवघेणा प्रवास : बीडच्या माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदीला पूर आल्याने नागरिकांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे. कोथाळा आणि सिरसाळा गावाचा संपर्क तुटला आहे. मागील तीन दिवसापासून मान्सूनचं आगमन झालं. मंगळवारी रात्री तालुका परिसरात दमदार संततधार पाऊस झाल्याने माजलगांव तालुक्यातील कोथाळा येथील सरस्वती नदीला पूर आल्याने नागरिकांना जीवघेणा करावा लागत आहे. कोथाळा येथील सरस्वती नदीला पाऊसामुळे पुर आल्याने पूलावरुन पाणी वाहत असल्याने सिरसाळ्याला जाणारा रस्ता बंद झाला आहे. यावर्षी चांगला पाऊस पडण्याची अंदाज हवामान विभागाने वर्तविलेला असून मागील तीन ते चार दिवसांपासून पाऊसाला सुरुवात झालेली आहे.

# आता शेततळ्यासाठी मिळणार तब्बल दीड लाखाचे अनुदान!

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्य सरकार शेततळ्यांसाठी तब्बल दीड लाख रूपयांपर्यंत अनुदान देत आहे. यामुळे शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता वाढवण्यास आणि त्यांच्या शेतीचे उत्पादन वाढवण्यास मदत होईल.

अनुदानाची रक्कम आणि पात्रता : १५ बाय १५ फुटांच्या शेततळ्यासाठी - खोदणीसाठी १८,६२१, अस्तरीकरणासाठी २८,२७५ असे एकूण ४६,८९६ रूपयाचे अनुदान मिळते.

२० बाय १५ फुटांच्या शेततळ्यासाठी - खोदणीसाठी २६,६७४, अस्तरीकरणासाठी ३१,५९८ असे एकूण ५८,२७२ रूपये अनुदान मिळते.

अर्ज कसा करायचा? : महाडीबीटीच्या अधिकृत हींींिः//ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करा. अर्ज शुल्क २३.६० एवढे आहे.



आवश्यक कागदपत्रे : सातबारा, आठ अ उतारा, आधारकार्ड, बँक पासबुक, हमीपत्र.

महत्त्वाचे मुद्दे : दर महिन्याच्या शेवटी लॉटरीद्वारे निवड होईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांना एका निश्चित मुदतीत कागदपत्रे अपलोड करावी लागतील. अधिक माहितीसाठी आपण आपल्या जवळच्या कृषी विभाग, कृषी सहाय्यक, मंडल कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकाऱ्यांना संपर्क साधू शकता.

# मेंढ्यांमध्ये वांझपणाचा धोका वाढतोय; करा 'हे' उपाय!

भीषण दुष्काळी परिस्थितीचा सामना करीत असतानाच मेंढपाळ व्यवसायाला फटका बसू लागला आहे. तो मेंढ्यामध्ये गर्भधारणा न होण्यामुळे. ओल्या चाऱ्याच्या अभावामुळे कुपोषित मेंढ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. गर्भधारणा न झाल्यामुळे मेंढ्यांचे उत्पादन थांबले आहे. नैसर्गिक संकटामुळे मेंढीपालन व्यवसायाचे लाखो रूपयांचे नुकसान होणार आहे. माडग्याळ जातीच्या काळ्या व पांढुरक्या पट्ट्याच्या मेंढ्या पाळल्या जातात. ही मेंढी जास्त काटक, वजनाला चांगली, चवदार मांस मिळत असल्यामुळे मागणी मोठी आहे. एका मेंढीपासून वर्षाला ७ ते ८ हजाराचे उत्पन्न मिळते. मेंढ्याचे प्रमुख खाद्य झाडपाला, बाभळीच्या शेंगा, ओले गवत आहे. पावसा अभावी बाभळीची झाडे, गवत वाळून गेले आहे. सकस आहारासाठी जनावरे कुपोषित झाली आहेत. गर्भाची वाढ व्यवस्थित होत नाही. वाढती उष्णता, सकस



आहाराचा अभाव, दूषित पाण्यामुळे गर्भपात व गर्भधारणा न होण्याच्या प्रमाणात २० ते ३० टक्के एवढी आहे.

हे उपाय करा : हत्तीगवत, लसुण गवत, पांगारी, बाभळीच्या झाडांची व गवताची लागण करावी. ओल्या चाऱ्याचा पुरवठा करावा याने चांगला फरक पडतो.

# जाणून घ्या निकृष्ट चारा पौष्टिक करण्याची पद्धत

जनावरांचे उत्तम आरोग्य आणि दूध उत्पादनासाठी लागणाऱ्या आवश्यक पोषक घटकांचा प्रमुख स्रोत हिरवा चारा आणि पशुखाद्य हे आहेत. हिरवा चारा टंचाईमुळे जनावरांना वाळलेला चारा द्यावा लागतो. कोरडा चारा म्हणून कडबा, मका, गव्हाचे काड, भात काड, सुकलेले गवत, सोयाबीन कुटार, बाजरीचे सरमाड इत्यादी घटकांचा वापर होतो. परंतु या चाऱ्यांची सकसता कमी असते, यातून पचनीय घटक कमी मिळतात. सुक्या चाऱ्यामध्ये प्रथिने कमी असल्यामुळे जनावर ढेरपोटे (जलोदर) दिसते. अशा सुक्या निकृष्ट चाऱ्यावर योग्य प्रक्रिया करून जनावरांच्या खाद्यात वापरला, तर त्याचा अनुकूल परिणाम दूध उत्पादन आणि जनावरांच्या वाढीवर होतो.

सुक्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्याची उद्दिष्टे : चारा निकृष्ट दर्जाचा असतो. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण कमी असते, ही प्रथिने पचण्यास कठीण असतात. तंतुमय पदार्थांचे प्रमाण जास्त असते. तंतुमय पदार्थामध्ये लिग्निन घटक जास्त असल्यामुळे असा चारा पचण्यास कठीण असतो. चाऱ्यामध्ये ऑक्झालेटसारखे घटक असतात, ते क्षार शोषून घेण्यास अडथळा निर्माण करतात. अन्न घटकांच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर, शरीर व वजनावर विपरीत परिणाम होतो.

निकृष्ट चाऱ्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपायः

चाऱ्याची कुट्टी -



चारा कुट्टी न करता दिल्यास जनावरे केवळ सुकी पाने, नरम भाग खाऊन खोडाचा भाग तसाच ठेवतात. त्यामुळे चाऱ्याची नासाडी होते. सुका चारा कुट्टी न करता दिल्यास नासाडीचे प्रमाण ३० टक्के असते. चुका चारा कुट्टी करून दिल्यावर नासाडी फक्त ५ टक्के एवढी होते. कुट्टी केल्यामुळे चारा चावण्यासाठी लागणारी ऊर्जेची बचत होते. चाऱ्याची पाचकता वाढते. कमी जागेत जास्त चारा साठवता येतो, कमी चाऱ्यामध्ये जनावरांचे संगोपन करता येते. निकृष्ट चारा कुट्टी करून काही प्रमाणात उपलब्ध चांगल्या चाऱ्यासोबत मिसळून वापरता येतो.

निकृष्ट प्रतीचा सुका चारा पाण्यात भिजवून देणे : निकृष्ट प्रतीचा सुका चारा जनावरांना खायला रुचकर वाटत नाही. त्यामुळे हा चारा जनावर अधिक प्रमाणात खात नाहीत. चाऱ्याचे १ ते २ सेंमीचे तुकडे करून ५ ते ६ तास भिजत ठेवावेत. त्यानंतर हा चारा खायला दिला तर तो अधिक प्रमाणात खातात. निकृष्ट चाऱ्यातील अपायकारक घटक ऑक्झालेटचे प्रमाण कमी होऊन कॅल्शिअमची उपलब्धता वाढण्यास मदत होते.

गूळ आणि मीठ प्रक्रिया : १०० किलो सुक्या चाऱ्यासाठी १ किलो गूळ आणि १ किलो मीठ प्रति २० ते २५ लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. हे द्रावण सम प्रमाणात फवारावे. हा चारा १२ ते २४ तास झाकून ठेवावा. त्यानंतर जनावरांना द्यावा. या प्रक्रियेमुळे चारा मऊ होतो, चव वाढल्यामुळे हा चारा जनावरे आवडीने खातात.

निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया :

कुट्टी केलेला चारा सावलीत पसरावा. १०० किलो चाऱ्यासाठी ४ किलो युरिया वापरावा. प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये विरघळून घ्यावा. हे द्रावण सम प्रमाणात १०० किलो कुट्टीवर शिंपडावे. चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशाप्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. प्रत्येक थरात युरिया मिश्रण मिसळून घेतल्यावर चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. संपूर्ण चारा जाड प्लास्टिक कागदाने झाकून घ्यावा. जेणेकरून बाहेरील हवा व पाणी आत जाणार नाहीत. २१ दिवस हा चारा हवा बंद ठेवावा कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसांनंतर हा चारा उघडावा. आवश्यक तेवढा चारा बाहेर काढावा. २ ते ३ तास पसरून उघडा ठेवावा, जेणेकरून त्यातील अमोनिया वायू निघून जाईल. त्यानंतर तो खायला द्यावा. शक्य असल्यास चाऱ्यावर गुळाचे पाणी शिंपडावे. त्यामुळे त्याची उपयुक्तता वाढते, तो रुचकर होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५८ : अठराशे सत्तावनच्या संग्रामातील मोरारची लढाई
१९०३ : फोर्ड मोटर कंपनीची स्थापना.
१९११ : एन्डिकोट, न्यूयॉर्क येथे द कॉम्प्युटिंग टॅब्युलेटिंग अँड रेकॉर्डिंग कंपनीची स्थापना झाली. याच कंपनीचे पुढे आय. बी. एम. या बलाढ्य कंपनीत रुपांतर झाले.
१९१४ : सहा वर्षाच्या तुरुंगवासातून लोकमान्य टिळक यांची सुटका
१९४७ : नव्या, कल्पक उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने म. स. तथा 'बाबुराव' पारखे यांनी मराठा चेंबरच्या वतीने कै. गो. स. पारखे औद्योगिक पारितोषिक देण्यास सुरुवात केली.
१९६३ : व्हॅलेन्तिना तेरेश्कोवा या रशियन महिलेने वोस्तोक ६ या यानातून अंतराळप्रवास करुन जगातील पहिला अंतराळ वीरांगना होण्याचा मान मिळवला.
१९९० : मुंबई व उपनगरात दिवसभरातील सर्वाधिक वृष्टी झाली. गेल्या १०४ वर्षातील जूनमधे एका दिवसात पडलेल्या पावसाचा (६००.४२ मि.मि.) उच्चांक गाठला गेला.
२०१० : तंबाखूवर पूर्णपणे बंदी करणारा भूतान हा जगातील पहिला देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस


१७२३ : ॲडम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (मृत्यू: १७ जुलै १७९०)
१९२० : हेमंत कुमार मुखोपाध्याय, प्रसिद्ध गायक, संगीतकार.
१९३६ : अखलाक मुहम्मद खान उर्फ कवी शहरयार ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी (मृत्यू: १३ फेब्रुवारी २०१२)
१९५० : भारतीय अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म.
१९६८ : अरविंद केजरीवाल 'आम आदमी पार्टी'चे संस्थापक, समाजसेवक व सनदी अधिकारी
१९९४ : आर्या आंबेकर, प्रसिद्ध गायिका.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६९ : भारतीय-इंग्रजी वनस्पतीशास्त्रज्ञ व संशोधक चार्ल्स स्टर्ट यांचे निधन. (जन्म: २८ एप्रिल १७९५)
१९२५ : बंगालमधील विख्यात कायदेपंडित आणि स्वातंत्र्यसेनानी देशबंधू चित्तरंजन दास यांचे निधन. (जन्म: ५ नोव्हेंबर १८७०)
१९३० : गॅरोकोम्पास चे सहसंशोधक एल्मर ॲम्ब्रोज स्पीरी यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १८६०)
१९४४ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (जन्म: २ ऑगस्ट १८६१)
१९७१ : बीबीसी चे सह-संस्थापक जॉन रीथ यांचे निधन. (जन्म: २० जुलै १८८९)
१९७७ : श्रीपाद गोविंद नेवरेकर, मराठी रंगभुमीवरील लोकप्रिय गायक, नट.
१९९५ : शुद्धमती तथा 'माई' मंगेशकर मंगेशकरांच्या मातोश्री

# तुरीला हंगामातील सर्वोच्च दर

## बळीराजाला दिलासा,नेमका किती मिळतोय दर?



तुर उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. तुरीच्या दरात वाढ झाली आहे. त्यामुळं तुर उत्पादकांना चांगला फायदा मिळत आहे. या आठवड्यात अकोल्यात तुरीला या हंगामातील सर्वोत्तम भाव मिळाला आहे. अकोल्यात सध्या तुरीचे भाव १२००० ते साडेतेरा हजाराच्या दरम्यान आहेत.

अकोल्यात उच्च प्रतीच्या तुरीला १३ हजार ८०० रुपयांचा दर

या आठवड्यात अकोल्यात तुरीला हंगामातील सर्वोत्तम भाव मिळाला आहे. अकोल्यात तुरीचे भाव सध्या १२००० ते साडेतेरा हजाराच्या दरम्यान आहेत. दोन दिवसांपुर्वी अकोल्यात उच्च प्रतीच्या तुरीला १३ हजार ८०० रुपयांचा प्रती क्विंटल भाव मिळाला होता. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या तुरीची आवक सुरु झाली आहे. यावर्षी तुरीला सरकारनं ७००० रूपये किमान आधारभूत मुल्य दिलं आहे. मात्र, सध्या हमीभावापेक्षा तुरीला ज्यादा दर मित आहे.

हंगामाच्या सुरुवातीला तुरीच्या घरात झाली होती घसरण

यावर्षी हंगामाच्या सुरुवातीला तुरीचे भाव पडल्याने तूर उत्पादक शेतकरी हवालदिल झाला होता. मात्र, अलीकडे बाजारात तुरीच्या वाढत्या मागणीमुळे तुरीला अच्छे दिन आल्याची परिस्थिती आहे. अकोल्यात सध्या तुरीला सरासरी १२००० एवढा सरासरी भाव प्रति क्विंटलला मिळत आहे. मात्र, या वाढलेल्या भावाचा फारसा फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याची खंत काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गावागावात जाऊन जनतेचे प्रश्न सोडवावेत

## आढावा बैठकीत आ.बाळासाहेब आजबे यांच्या कर्मचाऱ्यांना सूचना

आष्टी । प्रतिनिधी

सर्वसामान्य जनतेची काम हे मोठमोठे अधिकारी यांच्याकडे नसून ती तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक वायरमन आरोग्य सेवक यासारख्या कर्मचाऱ्यांकडे असतात त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी फिल्डवर जाऊन गावागावात पारावर बसून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवावेत कोणालाही वेठीस धरू नये ज्या ठिकाणी अडचणी येतील त्या अडचणी आम्हाला तात्काळ कळवाव्यात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी आष्टी तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आष्टी तहसील कार्यालयांमध्ये खरीप हंगाम २०२४ व इतर बाबींचा आढावा बैठक आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली यावेळी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे तहसीलदार गायकवाड नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे ,बाळासाहेब पिसाळ सावता ससाणे,यांची प्रमुख उपस्थिती होती ,यावेळी पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात एमआइजिअसची कामे सुरू आहेत कुठलेही काम बंद राहणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घेतली पाहिजे. वैयक्तिक लाभाच्या योजना ह्या सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम संबंधित कर्मचारी वर्गाचे आहे गावागावात या वेगवेगळ्या योजना विषयी माहिती देणे गरजेचे आहे एमआरएस च्या माध्यमातून शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीचा फायदा घ्यावा व फळबाग लागवड क्षेत्र कसे वाढेल याकडेही कृषी अधिकारी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे वृक्ष लागवड ही मोठ्या प्रमाणावर कशी वाढवता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, गाय गोठा ही योजना एमआरइजीएस मधून चालू करण्याच्या सूचनाही यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांनी गटविकास अधिकारी यांना दिल्या जनावरांचे टॅगिंग पूर्ण करून घ्यावीत व संभाव्य लशीबाबतचे लसीकरण करून जनावरे चे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने जनजागृती करावी ,जलसंधारन कामा बाबत बोलताना आमदार आजबे म्हणाले की १.६८ टीएमसी चे शिंपोरा येथून पाईपलाईनचे काम १८ किलोमीटर पूर्ण झाले आहे एक पंप हाऊस चे काम पूर्ण झाले असून एक वर्षाच्या आत काम या योजनेचे काम पूर्ण होणार आहे त्यामुळे या विभागातील अधिकाऱ्यांनी या योजनेतील कडे संपूर्ण लक्ष देणे गरजेचे आहे खुंटेफळ साठवण तलाव क्षेत्रातील ज्या मागील शेतकऱ्यांना ज्या दराने मोबदला मिळाला आहे त्याचप्रमाणे मोबदला सर्व शेतकऱ्यांना आता ही मिळाला पाहिजे यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करत आहोत याबाबत कोणी तुझा भाव करत असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेशही आमदार बाळासाहेब आजबे यांनी या बैठकीत दिले, उपजिल्हा रुग्णालयाची जागा विषय मार्गी लागला असून लवकरच ११५ कोटी रुपये किमतीच्या उपजिल्हा रुग्णालयाची इमारतीचे काम सुरू होणार आहे ,२०२४ खरीप हंगामाच्या बाबतीत कृषी विभागाने सतर्क राहणे गरजेचे आहे.




शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य बियाणे व खते कसे वापरावीत या संबंधित गावागावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे शेतकऱ्यांना कोणतेही बियाणे व खते कमी पडणार नाही यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत यापुढे खतांचा रॅक कायमस्वरूपी अहमदनगर येथे राहणार असल्यामुळे खते कमी पडणार नाहीत कृषी विभागांतर्गत १०६९ शेतकऱ्यांना साडेचार कोटीचा लाभ विविध योजनेतून झाला असल्याचेही यावेळी सांगण्यात आले यावेळी तहसील ,पंचायत समिती ,सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कृषी, विभाग वन विभाग ,पोलीस स्टेशन, गटशिक्षणाधिकारी ,बाल विकास अधिकारी, बँक ,जलसंधारण ,लघुपाटबंधारे या सर्व विभागातील अधिकारी उपस्थित होते सर्व विभागातील अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती देत कामकाजाबाबत आढावा सांगितला सर्व अधिकाऱ्यांना आमदार बाळासाहेब आजबे यांनी सर्वसामान्य जनतेचे काम कोणीही आडवु नका काम आडवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल सर्वसामान्य जनतेला त्रास होईल असे कोणीही वागू नये सामान्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठीच आपली नेमणूक केली आहे आपले काम प्रामाणिकपणे करावे अशा सूचनाही यावी शेवटी आ, बाळासाहेब आजबे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिल्या.


# हजरत राज मोहम्मद चौकाला आले तलावाचे स्वरुप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार पैठण- पंढरपूर तसेच जामखेड - पाटोदा जाणारे राष्ट्रीय महामार्ग आहे. या ठिकाणी पैठण - पंढरपूर अर्धवट काम झाल्याने नागरिकांना व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सिमेंट रस्ता व भुयारी नालीचे तात्काळ कम करा नसता आंदोलन करण्यात येईल असे इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.



पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार हजरत राज मोहम्मद चौकात पहिल्याच पाऊसात तलावाचे स्वरुप आले होते.यामुळे नागरिकांना व प्रवाशांना नाहक येथे सतत त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे येथील तात्काळ रस्त्याचे व भुयारी गटार चे काम करुन नागरिकांना या त्रासापासून सुटका करावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा देत आहे. पैठण - पंढरपूर /जामखेड-पाटोदा या राष्ट्रीय महामार्गावरील हजरत राजमोहम्मद चौक रस्त्यावर पाणी जमा होवू लागले. या ठिकाणी तलावाचे स्वरुप निर्माण झाल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होवू लागला. त्यामुळे ग्रामस्थांना व प्रवाशांना त्रास होत आहे. याची दखल पाटोदा नगरपंचायत व राष्ट्रीय महामार्ग अधिकार्यांनी घेऊन ज्याठिकाणी पाणी जमा होते त्याठिकाणी .सिमेंट रस्ता व भूयारी नाली काढण्यात यावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.



ठाकर आडगाव : तालुका गेवराई जिल्हा बीड येथील कुमारी शुभांगी कोकरे हिने इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत शंभर पैकी शंभर टक्के गुण मिळावल्याबद्दल युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य तथा वंचित बहुजन आघाडीचे गे नेते इंजिनिअर विष्णु दादा देवकते यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन सह परिवार सत्कार केला व पुढील कार्यास त्यांना शुभेच्छा दिल्या

# ऑल इंडिया पँथर सेनेमुळे महाविकास आघाडीचा राज्यात विजय - केदार

बीड । प्रतिनिधी

दलित , मुस्लिम , आदिवासी मतदारांनी राजकीय क्रांती केली .... बीड : ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी बीड दौऱ्यावर असताना पत्रकार परिषद घेऊन मत व्यक्त केले . यावेळी बोलताना या निवडणुकीत दलित , आदिवासी , मुस्लिम मतदारांनी संविधान वाचविण्याच्या बाजूने मतदान केले . महाराष्ट्रात दलित , मुस्लिम , आदिवासी , बहून घटकांसाठी लढणारी ऑल इंडिया पँथर सेना इंडिया आघाडी सोबत आल्यामुळे हाणून पाडण्याचे राज्यात महाविकास आघाडीचा विजय झाला आहे . भाजपने मत विभाजनाचे अनेक प्रयोग राबवले पण त्यांना काम आम्ही केले.

बीड लोकसभा उमेदवार बजरंग सोनावणे यांच्यासाठी आम्ही चार सभेला संबोधित केले , यात आष्टी , बीड , शिरूर , अंबाजोगाई समावेश आहे . माझ्या सारख्या लढाऊ प्रामाणिक , स्वाभिमानी , कार्यकर्त्यांनी संविधान वाचवणे , दलित अत्याचार यावर घेतलेली भूमिकेला मतदाराने गांभीर्याने घेतले आहे आणि राजकीय क्रांती झाली . ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा अध्यक्ष देव सर्व तालुका अध्यक्षांनी निस्वार्थ काम केले त्यांचे आम्ही स्वागत करतो . आज आम्ही संविधान वाचवू शकलो हे अभिमानाने सांगू शकतो , नरेंद्र मोदी संविधानाला नतमस्तक झाले हे क्रेडिट आमच्या भूमिकेचे आहे . राज्यात झालेल्या राजकीय क्रांतीचे आम्ही शिल्पकार आहोत . यापुढे भाजपाला छुप्या पद्धतीने मदत करणारे गट आमच्यापुढे टिकणार नाहीत . आम्ही जिकडे सत्ता तिकडे असेल , आंबेडकरी चळवळीने चौथ्या पर्वाचे नेतृत्व मान्य केले आहे हे या निवडणुकीतून सिद्ध झाले . बीड जिल्ह्यातील जातीय दुराव्याचे वातावरण योग्य नाही . महाराष्ट्राचा मणिपूर करण्याचा काही कर्मठ विघटनवादी विचारांचा अजेंडा आहे . आंबेडकरवादी आज मोठ्?या भाऊ होऊन आवाहन करतोय की , सामाजिक सलोखा अबाधित ठेवा . गावगाड्यात आपला आर्थिक स्त्रोत ऐकमेकांशी आहे तो जपला पाहिजे . तरुणांनी राजकीय प्रगल्भ झाले पाहिजे . सन्माननीय पंकजाताई मुंडे यांचा पराभव त्यांच्या भाजप नावाच्या पक्षांमुळे झाला . त्या अपक्ष असत्या तर निवडून ही आल्या असत्या पण ४०० पार चा नारा संविधान बदलून टाकण्यासाठी आहे हे भाजपाने पेरले त्यामुळे बीड नाही तर देशात याचा परिणाम झाला . स्मृती इराणी मराठा समाजामुळे पडलेली नाही . आयोधेत भाजपा पडली त्याला कारणीभूत मराठा नाही देशव्यापी भाजप विरोधी लहर पंकजाताई यांच्या पराभवाचे कारण आहे त्यामुळे त्यांनी व्यक्तिगत हताश होऊ नये , अफवा , संभ्रम निर्माण करू नये . जातीमुळे पराभव झाला हे चुकीचे आहे . मुस्लिम , दलित , आदिवासी हे भाजप विरोधात होते त्याचा हा फटका आहे . येणाऱ्या विधानसभेला आम्ही मुख्य रोल मध्ये असणार आहोत . या निवडणुकीत अनेकांचे अस्तित्व संपले आहे . कितीही बाशिंग बांधून तयार केलं तरी आता अस्त झालेले उगवणार नाहीत . जिंकण्याचे राजकारण , सत्तेचे राजकारण आम्ही अंगीकारले आहे . अंबाजोगाई केज , उदगीर , मेहकर किंवा माळशिरस या राखीव मतदारसंघातील जागा ऑल इंडिया पँथर सेनेला महाविकास आघाडीने द्यावी अशी आमची रणनीती असेल . लवकरच राज्यव्यापी आधिवेशन घेऊन आम्ही भूमिका जाहीर असे मत राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी व्यक्त केले . यावेळी जिल्हा अध्यक्ष नितीन सोनावणे , वसीम शेख , विनोद कोरडे , विनोद वडमारे , वैभव चक्रे , सुर्यकांत ठोकळ , अनिल शेलार , आकाश ढोकणे व संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# बस स्थानकाला आले तलावाचे स्वरूप ; प्रवाशांचे हाल

धारूर । प्रतिनिधी

बस स्थानकाच्या विकासाचा प्रश्न गेले अनेक वर्षे झाले प्रलंबित असल्यामुळे बसस्थानकामध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत बस स्थानकाची इमारत प्रवाशांना अपुरी पडत आहे तसेच बस स्थानकातील इमारतीच्या समोरचा परिसरावर खड्डे पडले आहेत याकडे आगार प्रमुखांनी लक्ष देऊन प्रवाशांना सुविधा देण्याची मागणी होत आहे

किल्ले धारुर शहरातील बस स्थानकाची निर्मीती झाली त्यावेळेस पासून आहे तसेच पाहायला मिळते दोन चार वर्षाला बस स्थानकातील बैठक व्यवस्थेची रंगरंगोटी केली जाते.किल्ले धारूर येथील बस स्थानक मध्ये असणाऱ्या रस्त्यांवर पहिल्याच पावसात खड्ड्यांमध्ये पाणी जमा होऊन तलावाचे स्वरूप आले आहे बस स्थानकाच्या विकासाचा प्रश्न प्रलंबित असल्या कारणामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे बसमध्ये चढत असताना प्रवाशांना पाण्यातून मार्ग काढण्याची वेळ आली आहे बस स्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. बस स्थानकाच्या परिसरात सुरू असलेले स्वच्छालयाचे कामही अर्धवट झाले आहे त्यामुळे महिलांना अडचणीचा सामना करावा लागत आहे बस स्थानकात येणाऱ्या वयोवृद्ध नागरिक महिला लहान बालके यांना पाण्यातून रस्ता शोधण्याची कसरत करावी लागत आहे.



शहरातील बसस्थानक परिसरात पाणी साचणार नाही व दगडगोटे उघडे असल्याने बसच्या टायरच्या दाबाने उडून प्रवाशी जखमी पडणार नाहीत यासाठी तात्काळ बस स्थानक परिसरात सिमेंट काँक्रेट करावे. बस स्थानक परिसरात महिला व पुरुष प्रवाशी हे उघड्यावर लघुशंकेसाठी बसतात त्यामुळे बस स्थानकावर असलेले शौचालय बांधकाम पुर्ण झाले आहे ते प्रवाश्यांना उपलब्ध करुन द्यावे.

विजय शिनगारे, सामाजिक कार्यकर्ते

आगार प्रमुखांनी मूलभूत सुविधा देण्याकडे लक्ष देण्याची मागणी शहरातील नागरिक करत आहेत. किल्ले धारूर एसटी डेपो आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे याचा विचार वरिष्ठ कार्यालयातील अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी किल्ले धारुर शहरातील बसस्थानक व बस स्थानकावरील सुविधांकडे लक्ष द्यावे अशी चर्चा तालुक्यातील नागरिक करत आहेत.

# गो.कु.यो.कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव ;गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शालेय समितीच्या अध्यक्षा ॲड.कल्याणी विर्धे,शालेय पदाधिकारी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक देऊन नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताता ॲड.विर्धे म्हणाल्या की, योगेश्वरी शिक्षण संस्थेची यशाची परंपरा उज्वल आहे विद्यार्थीनींनी अभ्यास करून ही परंपरा जतन करावी व नाव उज्वल करावे असे सांगितले.



विद्यालयातील विद्यार्थिनी पहिल्याच दिवशी मोठ्या आनंदात दिसत होत्या. प्रगती विभागात प्रवेशोत्सव खोलेश्वरच्या प्रगती विभागामध्ये प्रवेशोत्सव - २०२४' हा कार्यक्रम बालवाडी ते चौथी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. यावेळी रविवार पेठ केंद्र प्रमुख कमलाकर कापसे,शालेय समिती अध्यक्ष उन्मेष मातेकर, मुख्याध्यापक आप्पाराव यादव ,विभाग प्रमुख वर्षा मुंडे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन व प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. बालवाडी ते चौथीच्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. वर्गश: विद्यार्थ्यांचे मनोरंजक खेळ घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले. तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. खाऊचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांनी प्रवेशोत्सव व शाळेच्या पहिल्या दिवसाचा मनमुरादपणे आनंद लुटला कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी सहकार्य केले.

# अंबाजोगाईतील ब्रह्माकुमारीज आनंदसरोवर येथे दोन दिवसीय शिबिर

## ब्रह्माकुमार दशरथ भाई यांचे मौलिक मार्गदर्शन ; गीता पाठशाळेच्या सदस्यांची उपस्थिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील ब्रह्माकुमारीज आनंदसरोवर, अंबाजोगाई ओम शांती सेंटर येथे नुकतेच दोन दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विघ्न विनाशक स्थिती कशी बनविता येईल यासाठी ज्वाला स्वरूप भट्टी संपन्न झाली. ब्रह्माकुमार दशरथ भाईजी यांनी मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी गीता पाठशाळेच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या शिबिराचे उद्घाटन ब्रह्माकुमार दशरथ भाई (पुणे), न्यायदंडाधिकारी सचिन मेहता, बीके गोपाळ रांदड, सेंटरच्या प्रमुख बीके सुनिता बहेन, बीके मंजू बहेन व इतर प्रमुखांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. बीके सुनिता बहेन यांनी बीके दशरथ भाई यांचे स्वागत केले. तसेच त्यांचा परिचय ही करून दिला. या शिबिरात पहिल्या दिवशी योगधारणा करण्यात आली. यामध्ये एकूण २५० जणांनी सहभाग घेतला. त्यानंतर 'मन स्वच्छ बुद्धि क्लिअर रख, डबल लाईट स्थिती का अनुभव करो' या विषयावर बीके दशरथ भाई यांनी दोन तास मौलिक विचार मांडले. त्यांनी उपस्थितांना चिंतन, मनन, ज्ञान, योग तसेच सेवाभाव यांचे जीवनातील महत्व पटवून दिले. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार हे विकार आणि वाईट विचारांपासून दुर रहा असे सांगितले. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी २० ते ५० वर्षे वयोगटातील पती-पत्नी व इतर अशा एकूण ३०० जणांनी सहभाग घेतला. 'अध्यात्मिक शक्ती द्वारा स्वस्थ एवम सुखी परिवार कसा करावा' या विषयावर बीके दशरथ भाई यांनी अनमोल विचार मांडले. त्यांनी उपस्थितांना आयुष्यात संकुचित विचार करू नये, कुटुंबात एकमेकांचा आदर करा असा मौलिक संदेश दिला. दोन दिवसीय कार्यक्रमास परिसरातील आडस, केज, कळंब, परळी, रेणापूर, बर्दापूर, हातोला, तळेगाव, घाटनांदुर, आंदोरा, बनसारोळा, ममदापूर पाटोदा, आपेगाव, चनई, मोरेवाडी या गावातील गीतापठण शाळेचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता ईश्वरीय प्रार्थनेने झाली. बीके मंजू बहेन यांनी सर्व सहभागी व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बीके मंजू बहेन, बीके प्रिया बहेन, गोपिका बहेन, बीके महादू भाई, बीके शिल्पा बहेन, बीके मधू बहेन, बीके पंक्ती बहेन व इतर माता भाई यांनी सहकार्य केले.




# पाटोदा न्यायालय परिसरामध्ये व्रक्षारोपन



पाटोदा । प्रतिनिधी

आज दिनांक १४ जून २०२४ रोजी पाटोदा न्यायालय परिसरामध्ये पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड.सुशील कोठेकर, सचिव ॲड.सचिन जावळे साहेब, उपाध्यक्ष ॲड. सुधीर घुमरे साहेब, ॲड.जगदाळे साहेब, ॲड.अमरिश वैद्य, ॲड.थोरवे साहेब,ॲड.बी.बी.जावळे, सहाय्यक सरकारी वकील ॲड.पांडव, ॲड. तळेकर, ॲड.विलास पवार इत्यादी विधिज्ञ तसेच पाटोदा न्यायालयाचे कुलकर्णी साहेब, धन्वे ,गाडे, आशोक जाधव, आर्सुळ ,पुजा वाघमारे ईत्यादी सह सर्व न्यायालयीन कर्मचारी,अंमळनेर पोलिस स्टेशनचे येवले साहेब व पक्षकार बांधव उपस्थित होते.

# खते व बी-बियाण्यांची कृत्रिम टंचाई जाणीवपूर्वक, कृत्रिम टंचाईसह चढ्या भावाने विक्री व लिंकिंगवर कृषी विभागाची करडी नजर - कृषिमंत्री धनंजय मुंडे

## राज्यात खत, बी-बियाण्यांचा कुठेही तुटवडा भासू देणार नाही, शासनस्तरावर टास्क फोर्स नेमून सुयोग्य नियोजन केले जात आहे -धनंजय मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात यंदाच्या खरीप हंगामात समाधानकारक पाऊस पडेल अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने बी-बियाणे, खते, कीटकनाशके आदी कृषी निविष्ठा शासन व बाजार स्तरावर मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. राज्यात कुठेही तुटवडा भासू देणार नाही, याबाबत शासन स्तरावर टास्क फोर्स नेमून सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे; अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्यात बोगस बियाणे, लिंकिंग, खत-बियांची चढ्या भावाने विक्री या विरोधातील ५ कृषी कायदे प्रस्तावित केल्यानंतर काही ठराविक घटकांकडून राज्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई भासवली जात आहे. हा संपूर्ण प्रकार जाणीवपूर्वक केला जात असून, खतांची व बियांची कृत्रिम टंचाई भासवणे किंवा त्याआडून चढ्या भावाने विक्री करणे याबाबत धडक कारवाया करणे सुरू असल्याचेही धनंजय मुंडे याप्रसंगी बोलताना म्हणाले.

यावेळी धनंजय मुंडे यांनी राज्यभरात स्थानिक पथकांकडून करण्यात आलेल्या कारवायांची आकडेवारीच पत्रकारांसमोर मांडली.दरम्यान राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार हेल्पलाईन साठी तक्रारी देण्यासाठी थेट व्हाट्सप क्रमांक (९८२२६६४४५५) हा उपलब्ध करून देण्यात आला असून, यावर आतापर्यंत यावर १५३ तक्रारी आल्या आहेत. तर त्यापैकी वैध ७५ तक्रारींविरुद्ध कारवाई करण्यात आली असल्याचे मुंडेंनी स्पष्ट केले.



धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज बीड जिल्ह्यात महावितरण कडील प्रलंबित कामे, पावसाळ्याचे नियोजन, विविध योजना आदींच्या संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस आ.प्रकाशदादा सोळंके, आ.बाळासाहेब काका आजबे, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री भुमे यांसह महत्वाचे अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान बीड लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा निसटता पराभव झाला. याविषयी धनंजय मुंडे यांनी आज पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर भाष्य केले. अत्यंत वेगळ्या परिस्थितीत विकास बाजूला ठेवून इतर मुद्द्यांवर ही निवडणूक लढवली गेली. त्यात अत्यल्प मतांनी आमचा पराभव झाला, तो आम्ही मान्य केला तसेच पराभवाची जबाबदारी देखील एका अर्थाने मी घेतली आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले. निवडणुकीत जय-पराजय होत असतात. पुढेही अनेक संधी येतील. मात्र निवडणुकीत पराभव झाला म्हणून विवंचना व नैराश्यातून काही कार्यकर्त्यांनी अत्यंत टोकाचे पाऊल उचलले. हे आमच्या मनाला अत्यंत वेदना देणारे व आमच्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण करणारे आहे. ही काही शेवटची निवडणूक नाही, पण जीवन किंवा कुटुंब मात्र पुन्हा मिळत नाही, त्यामुळे या विवंचनेतून बाहेर पडून पुढील लढाई साठी सज्ज होऊ, असे आवाहन यावेळी धनंजय मुंडे यांनी समर्थक कार्यकर्यांना केले आहे.

# वॉशिंग मशीनने घेतला चिमुकल्या उदयसिंगचा बळी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

५ वर्षीय ''उदयसिंग'' या चिमुकल्याची वॉशिंग मशीन मध्ये खेळणी पडते काय, तो ती काढावयास जातो काय आणि पाण्यात बुडून त्याचा दुर्दैवी मृत्यू होतो काय? माणवी मनाला चटका लावणाऱ्या या हृदय द्रावक घटनेने केवळ अंबाजोगाईकरच हळहळले नाहीत तर ज्यांच्या ज्यांच्या कानी ही घटना गेली तो हळहळल्या शिवाय आणि त्याचे डोळे पाणावल्या शिवाय राहणार नाहीत.



गुरुवार रात्री ९ वाजण्याची वेळ, अंबाजोगाई येथील हौसिंग सोसायटी नजीक राहणारे सर्व परिचित वकील ऍड जयसिंग चव्हाण यांना त्यांच्या विवाहा नंतर तब्बल १५ वर्षाने पुत्र रत्न झाले, चव्हात्रण परिवाराचा आनंद गगनात मावेना, या पुत्र रत्नांचे नाव उदयसिंग असं ठेवण्यात आलं. हळूहळू उदयसिंग मोठा होऊ लागला. बऱ्याच वर्षाने पुत्ररत्न झाल्याने सर्वांचा तो लाडका आणि आई वडिलांचा तर तो जिगर का तुकडा असणारच की.

पाहता पाहता उदयसिंग ५ वर्षाचा झाला, उदयसिंगच्या भावी आयुष्याचे त्यांचे वडील ऍड जयसिंग चव्हाण व त्यांची पत्नी स्वप्न पाहू लागली आणि याच स्वप्नात गुरुवारची रात्र दाम्पत्या साठी काळ रात्र ठरली आणि संपूर्ण स्वप्नाचा चक्काचुर झाला.

गुरवरची रात्र साधारण ९ ची वेळ ऍड जयसिंग चव्हाण मित्रा सोबत गप्पा मारत बसतायत, त्यांची पत्नी घरी स्वयंपाक करत असते, तिला त्यांचा लाडका उदयसिंग समोर दिसत नाही त्यामुळे ती पतीला कॉल करते, '' उदयसिंग तुमच्या सोबत आहे का?'' तो आपल्या सोबत नसल्याने सांगून ऍड जयसिंग चव्हाणही घाबरतात आणि लगबघिने घर गाठतात, घरी शोधा शोध सुरू ◀◀ पान ३ वर

# पिंपरी घाटा शिवारात सापडला अज्ञात महिलेचा मृतदेह

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा शिवारात असणाऱ्या घाटामध्ये एका महिलेचा मृतदेह सापल्याची घटना दि.१५ जुन रोजी सकाळी ठिक आकाराच्या दरम्यान घडली एक प्रवासी रोड साईटवर लघुशंका करण्यासाठी थांबला असता त्या व्यक्तीला हा मृतदेह दिसुन आला असता त्याने म्हसोबावाडी चौकात गावकऱ्यांना फोन करुन सारा प्रकार सांगितला व गावकऱ्यांनी हद्दीत असणारे पोलिस ठाण्यात हा प्रकार कळवताच अंभोरा पोलिस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे व त्यांचा कर्मचारी स्टाप घटनास्थळी भेट दिली अंभोरा पोलिस सपोनि मंगेश साळवे उपनिरीक्षक भडके,पो को, केदार पो को ,तांदळे ,पालवे मॅडम यांच्या समवेत त्या मृतदेहाचा पंचनामा झाला व शवविच्छेदन साठी प्राथमिक आरोग्य केंद्र सुलेमान देवळा येथे पाठवण्यात आले सदरील घटनेचा महिलाचे वर्णन उजव्या हाताच्या कोपरापुढे गोंधलेले, उजव्या हाताचे करंगळी जवळील बोट आखुड असलेले, डाव्या हातात लाल-सफेद रंगाची कचकडीची एक बांगडी, डाव्या हाताच्या करंगळी जवळील बोटात एक सफेद धातूची अंगठी, नाकात बारीक मुरनी, डोक्याचे केस सफेद काळे मध्यम लांब, अंगात गुलाबी रंगाचा व त्यावर आकाशी पिवळे रंगाचे फुले असलेला गाऊन, तसेच पिवळ्या रंगाचा परकर परिधान केलेला तपास मदतीसाठी प्रेत ओळखीचे असल्यास अंभोरा पोलिस स्टेशन ला संपर्क करा असे आव्हान सपोनि मंगेश साळवे यांनी केले आहे.

# राज्य सरकारकडून वक्फ मंडळाला १० कोटींचा निधी





## उपमुख्यमंत्री ना.अजित पवारांसह महायुती सरकारचे डॉ.योगेश क्षीरसागरांकडून आभार

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील 'वक्फ' मंडळाचं बळकटीकरण करण्यासाठी सरकारनं १० कोटींच्या निधीची तरतूद केलीय. त्यापैकी २ कोटी रुपये १० जूनला वितरीत केल्याचा शासन आदेश अल्पसंख्यांक विकास विभागानं काढला आहे. अल्पसंख्याक समाजाच्या हिताचा निर्णय असल्याचे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, राज्यातील महायुती सरकारनं वक्फ मंडळासाठी १० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. त्यापैकी संभाजीनगर येथील 'वक्फ' मंडळाला राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून २ कोटींचा निधीही वितरीत करण्यात आला आहे. या निधीमुळं अल्पसंख्याक समाजाला बळकटी मिळणार असून अल्पसंख्याक समाजातील शिक्षण, आरोग्याच्या प्रश्नासाठी हा निधी वापरला जाणार आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समाजाची प्रगती होणार आहे. हा हिताचा निर्णय घेतल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत.



# महेशनवमीनिमित्त शोभायात्रा

बीड । प्रतिनिधी

माहेश्वरी समाजाच्या वतीने माहेश्वरी समाज उत्पत्ती दिवस म्हणजे महेशनवमी निमित्त बीड शहरामध्ये भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मोंढा भागाचे नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी या यात्रेत सहभाग घेवून माहेश्वरी समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

माहेश्वरी समाजाच्या वतीने महेशनवमीच्या निमित्ताने दरवर्षी बीड शहरातून शोभायात्रा काढून महेशनवमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी माहेश्वरी समाजाच्या वतीने भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त रथ सजवून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी मुलांनी वेशभूषाही केली होती. या यात्रेमध्ये मोंढा परिसरातील व्यापारी बांधव, समाजबांधव, महिला-भगिनी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या भागाचे नगरसेवक अमर नाईकवाडे यांनीही या यात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

# अॅड. महादेव तुपे यांच्या मुलाचा साखरपुडा मोठ्या थाटात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

श्री. क्षेत्र संस्थान नारायणगडाचे विश्वस्त अॅड. महादेव तुपे यांचा मुलगा चि. युगंधर व दगडी शहाजानपुर चे मा. सरपंच प्रकाशराव इंदुरे यांची कन्या चि. सौ. का. जयश्री यांचा साखरपुड्याचा कार्यक्रम सम्राट लॉन्स, बीड येथे संत-महंत, राजकीय, सामाजिक, धार्मीक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व नातेवाईक आणि मित्र परिवाराच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.



साखरपुड्याच्या कार्यक्रमास शुभाशिर्वाद देण्यासाठी विशेषकरुन श्री. क्षेत्र संस्थान नारायणगडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि जेष्ठ नेते मा. शिवाजीराव दादा पंडीत, मा. मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर, मा. आ. राजेंद्र जगताप, माजी मंत्री सुरेशवराव नवले, माजी मंत्री बदामराव पंडीत, शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे, मा.आ.जनार्धन तुपे, मा.आ. सुनिल धांडे, महंत ह.भ.प. संभाजी महाराज, महंत ह.भ.प. दत्ता महाराज, महंत ह.भ.प. श्रीरंग महाराज डोंगरे, ह.भ.प. लक्ष्मण महाराज तकीक, बहुजन वंचीतचे नेते अशोकराव हिंगे, गेवराई राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, वडगांव सुशीचे मा. सरपंच भागवतराव काळे काका, मराठा क्रांती मोर्चाचे ऋषीकेष बेदरे, नारायणगडचे विश्वस्त आणि शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल दादा जगताप, विश्वस्त .प्रा.जे.पी. शेळके, सी.ए.बी. बी. जाधव, बळीराम गवते, गोवर्धन काशिद, भिमराव मस्के, कर्मयोगीनी सावित्रीबाई फुले विद्यालय बीड च्या अध्यक्षा सौ. अंजली ऋषीकेष शेळके, संपादक अजित वरपे, बलभिमराव जाहेर पाटील, न.प. बीड चे मा. सभापती नरसिंग नाईकवाडे, मा. सभापती सुभाषराव सपकाळ, मा.जि.प. सदस्य विलासराव बडगे, मा.जि.प. सदस्य ◀◀ पान ३ वर

# यशाला कुठलाही शॉर्टकट नसतो प्रमाणिकपणे प्रयत्न हाच यशाचा कानमंत्र - सुरेश महाराज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

**उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जितोड मेहनत करा. यश मिळवण्यासाठी उत्तम मार्गदर्शक आणि कठीण परिश्रम मेहनत आवश्यक असते. असे प्रतिपादन श्री ह भ प प्रा.नाना महाराज कदम यांनी केले. बीड तालुक्यातील आंबिलवडगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती माझी न्यायमूर्ती बिपिन मंत्री ,ज्येष्ठ विधीज्ञ मनोहर तांदळे, कृषी विद्यापीठ परभणीचे शास्त्रज्ञ डॉ संदीप पायाळ, सुरेश महाराज जाधव, सरपंचपती चंद्रसेन कीलमिसे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रसाळ सर, छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खेडकर यांच्या सह सर्व शिक्षक वृंद यांची उपस्थिती होती.**

बीड तालुक्यातील आंबिलवडगाव येथे कै. अण्णासाहेब तांदळे शिक्षक प्रसारक मंडळाच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.. शाळेचा निकाल १०० टक्के लागला. शाळेचा व गावकऱ्यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये कु. वैष्णवी तांदळे -९१% प्रथम क्रमांक, सानिया भालेराव-९० %द्वितीय , प्रगती गंगावणे-८९% तृतीय क्रमांक मिळवले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुरेश महाराज जाधव म्हणाले की यश मिळवत असताना कुठलाही यशाला शॉर्टकट नसतो. प्रमाणिकपणे प्रयत्न हाच यशाचा कानमंत्र आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नाना महाराज म्हणाले की उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जी तोड मेहनत करा ज्यामधून यश मिळेल.

# रेवली गावात एचआयव्ही/एड्स जनजागृती व तपासणी शिबिर संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मौजे रेवली येथे एचआयव्ही एड्स जनजागृती तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे ७३ ग्रामस्थांनी तपासणी केली. सदरील शिबिर हे आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. सदरील शिबिरास रेवली ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला.

दि. १३ जून २०२४ रोजी जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंधक कक्ष जिल्हा रुग्णालय बीड व वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय परळी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमानाने ग्रामपंचायत रेवली या गावात एच आय व्ही जनजागृती व तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात प्रथम समुपदेशक श्री शरद चव्हाण यांनी सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकरी यांना एच आय व्ही / एड्स ,टीबी गुप्तरोग या आजारांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आईसी वाटप करण्यात आली व नंतर प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री अमोल गालफाडे यांनी गावकऱ्यांची रक्त तपासणी केली. ◀◀ पान ३ वर



आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वै. व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त उपक्रम

# विज वितरण कंपनीने गाव फिडर योजनेची कामे लवकरात लवकर पूर्ण करावे -आ.प्रकाश सोळंके



**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील वीज वितरण व अनुषंगिक बाबींचा आढावा दि १४ जुन रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री मा.धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

शासनाने जिल्ह्यात दुष्काळी व दुष्काळ सदृश्य स्थिती जाहीर केल्याने शेतकऱ्यांना आतापर्यंत सुमारे ३ लाख शेतकऱ्यांना ५६ कोटी ८० लाख रुपये वीज बिल सवलत दिली आहे. यातून वंचित राहिलेल्या आणखी ३६ हजार शेतकऱ्यांना हा लाभ देण्याचा सकारात्मक निर्णय बैठकीत घेण्यात आला.या बैठकीत वीज वितरण कंपनीच्या वाहिनी ◀◀ पान ३ वर

# पेठ बीड भागात रा.काँ.ला खिंडार, बंडू निसर्गंध यांचा माजी मंत्री क्षीरसागर गटात जाहीर प्रवेश

बीड । प्रतिनिधी

शहरातील पेठ बीड भागातील अनिल उर्फ बंडू निसर्गंध यांनी त्यांच्या शेकडो समर्थकासह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या गटात जाहीर प्रवेश केला.

पेठ बीड भागातील रा.काँ.चे युवा नेते अनिल उर्फ बंडू निसर्गंध यांनी रा.काँ.ला सोडचिट्ठी देऊन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून माजी मंत्री क्षीरसागरांच्या गटात शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी विलास बडगे, दिनकर कदम, मुखीद लाला, अॅड.खाजा भाई, दिपक थोरात, सुधाकर मिसाळ, सुलेमान पठाण, सनी वाघमारे, शुभम धन्वे, सागर धन्वे, मनोज मस्के, प्रमोद शिंदे, कपिल सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, विकास कामाच्या प्रक्रियेमध्ये काम करण्याची भुमिका ठेवून सगळ्यांना एकत्र करून आपल्या भागाचा विकास कसा होईल यासाठी बंडू निसर्गंध यांनी जाहीर प्रवेश केला त्यांचे स्वागतच आहे असे सांगून येणारा काळ आणि संधीचा कसा उपयोग होईल यासाठी प्रयत्न केला जाईल. पेठबीड भाग म्हणजे शहराची व्यापार पेठ आहे. येथे अनेक जाती धर्माचे लोक राहतात श्रम आणि कष्ट करून उपजिवीका भागवतात. त्यांच्या हाताला काम देण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे त्यांनी सांगितले.



याप्रसंगी लक्ष्मण मस्के, कल्याण डोंगरे, विक्की चांदणे, विक्की डोंगरे, उत्तम सोनकांबळे, शिवाजी जाधव, नितीन मुजमुले, संतोष सोनकांबळे, साळवे सर, सौरभ धन्वे, रविंद्र डोंगरे, विशाल मस्के, अनिल डोंगरे, गणेश शेळके, उमेश कांबळे, सुनिल निसर्गंध, विकास शिंदे, रमेश गाताडे, अमित सपकाळ, सचिन राऊत, नितीन सपकाळ, भागवत जाधव, संकेत शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणावर भर द्यावा-डॉ.नीलम गोऱ्हे

पुणे दि.१५: बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यासह शाळाबाह्य मुलांचे शिक्षण आणि पाल्य व पालकांच्या प्रशिक्षणावर भर द्यावा, तसेच वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबतही आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले.

पुण्यात अलिकडे झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियोजन, बालगुन्हेगारी प्रतिबंध आणि ससून रुग्णालयातील व्यवस्थापनाबाबत दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस महिला व बालविकास आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे, महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवडचे प्र.पोलीस आयुक्त सुनील रामानंद, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, ससूनचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत म्हस्के, उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक सुजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, बाल न्याय कायद्यानुसार गंभीर गुन्ह्याबाबत कारवाई करताना गुन्हेगारांना प्रौढ समजण्यात यावे यादृष्टीने नियमांचा अभ्यास करून कार्यप्रणाली निश्चित करण्याचा प्रयत्न करावा. जिल्हाधिकाऱ्यांकडे होणाऱ्या बाल कल्याण समितीच्या बैठकांमधील कामकाज गांभिर्याने होईल याकडे लक्ष द्यावे. बाल गुन्हेगारी रोखण्यासोबत गंभीर गुन्ह्यात शिक्षा होईल यादृष्टीने कार्यवाही करण्यावर भर द्यावा. महानगरपालिकेने शाळाबाह्य मुलांना शाळेत आणण्याची मोहिम राबवावी, यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पोलीस विभाग गुन्हे शोधण्यासाठी उपयोग करीत असलेली सीसीटीएनएस प्रणाली बाल गुन्हेगारांसाठी लागू करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल.




शहरातील ब्लॅकस्पॉटची माहिती संकलीत करून अशा ठिकाणी सीसीटीव्ही लावल्यास वाहतूकीवर चांगल्याप्रकारे नियंत्रण करता येईल. सण आणि उत्सवांच्या कालावधीत वाहतूक नियंत्रणाबाबत आतापासून नियोजन करावे. शहरातील अतिक्रमणे काढण्याबाबत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल महानगरपालिकेने सादर करावा. महानगरपालिका आणि पोलीस विभागाने अपघात रोखण्यासाठी संयुक्त मोहिम राबवावी.

ससून रुग्णालयाने नागरिकांच्या तक्रारी कमी करण्यावर भर द्यावा. आरोग्य सेवेत ससून रुग्णालयाचा लौकीक चांगला असून तो वाढविण्याचा प्रयत्न करावा. आरोग्य क्षेत्रातील चांगल्या स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींची मदत घेवून कामकाजात पारदर्शकता वाढविण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

मद्यसेवनासाठी परवाना देण्यासाठी भरावयाचे शुल्क वाढविण्याबाबत आणि एक दिवसाचा परवाना देताना मुले अल्पवयीन आहेत का हे तपासण्यासाठी काटेकोर नियमावली करणे शक्य आहे का याचा विचार करावा. मद्य विक्री आणि परवान्याचा वापर याचा ताळमेळ घेण्याची व्यवस्था निर्माण करता येईल का याचा विचार करावा. अवैध दारू विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे निर्देशही डॉ.गोऱ्हे यांनी दिले. आयुक्त डॉ. नारनवरे म्हणाले, बाल न्याय कायद्यानुसार बालगुन्हेगारांचे पुर्नवसन करण्यावर भर देण्यात आला आहे. बाल न्याय मंडळातील महिला व बालविकास विभागातर्फे नियुक्त प्रतिनिधींच्या प्रशिक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. वारंवार गुन्हे करणारे आणि गंभीर गुन्ह्यातील बालगुन्हेगारांवर कारवाई करण्यासाठी नव्या बाल कायद्याबाबत राज्यासाठीची नियमावली लवकरच करण्यात येत आहे. त्यात प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समितीच्या कामकाजातही सुधारणा करण्यात येत आहे.

महानगरपालिका आयुक्त डॉ. भोसले म्हणाले, अनधिकृत हॉटेल आणि रुफ टॉप हॉटेलवर महानगरपालिकेतर्फे कारवाई करण्यात आली आहे. शहरातील पदपथावरील आणि रस्त्याच्या बाजूला असेलेली अतिक्रमणे काढण्याची मोहिम सुरू करण्यात आली आहे. नियमबाह्य जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक सुरक्षेच्यादृष्टीने रस्त्यांच्या रचनेत सुधारणा करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, पुणे शहरातील वाहतूक सुरक्षेबाबत मागील १५ दिवसात पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दोनदा बैठक घेण्यात आली असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. शहरातील सुमारे ५० ब्लॅकस्पॉटबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अवजड वाहनांना शहराच्या मध्यभागात वाहतूकीसाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. १६ ते १८ वर्षातील बालगुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त श्री.रामानंद म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरात रात्री 'ड्रिंक एड ड्राईव्ह' ला प्रतिबंध घालण्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वाहतूक नियमांविषयी समुपदेशन करण्यात येत आहे. डॉ.म्हस्के म्हणाले, ससून रुग्णालयाच्या कामकाजात पारदर्शकता आणि सुसूत्रता आणण्यासाठी आदर्श प्रणाली निश्चित करण्यात आली आहे. दररोज कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे. चांगली रुग्णसेवा देण्याचा रुग्णालय प्रशासनाचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

अतिरिक्त आयुक्त श्री.खोराटे यांनी पिंपरी चिंचवड शहरात वाहतूक नियोजन आणि रस्ता सुरक्षेबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाचे श्री.पाटील यांनी उत्पादन शुल्क विभागातर्फे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

## साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याचा आनंद : भारत सासणे

पुणे । प्रतिनिधी

बालसाहित्याच्या लेखनासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला आहे. प्रत्यक्षात अनेक वर्षे मी बालसाहित्य लिहित आहे. समशेर आणि भूतबंगला या कादंबरीतील पात्र जाणीवपूर्वक निर्माण करून कुमार आणि किशोरवयीन मुलांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. निर्माण केलेल्या पात्राच्या माध्यमातून किशोरवयीन मुलांना बुद्धिचातुर्य कथा सांगण्याचा प्रयत्न मी या कादंबरीतून केला आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून कादंबरीतील हे पात्र रूजले आहे. याचाही आनंद आहे, अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी साहित्य संमेलनाध्यक्ष भारत सासणे यांनी शनिवारी (दि.१५) व्यक्त केली.



साहित्य अकादमीच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला बाल साहित्य पुरस्कार २०२४ जाहीर झाला असून, तुळजापूर येथील देविदास सौदागर यांची 'उसवण' कादंबरी युवा पुरस्काराची मानकरी ठरली आहे. विविध भाषांतील बालसाहित्य तसेच युवा पुरस्कारांची घोषणा साहित्य अकादमीकडून शनिवारी केली. यामध्ये असामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड़, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, राजस्थानी, संताली, सिंधी, तमिळ, तेलगू आणि उर्दू भाषेतील लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे. सासणे म्हणाले, 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीतील काही भाग 'साधना'च्या अंकात प्रकाशित झाले आहेत. विशेष म्हणजे साधना अंकासाठीच काही भाग लिहिले आहेत. बालसाहित्यामध्ये वेगवेगळे प्रयोग आज होत आहे. आकर्षक स्वरुपामध्ये पुस्तके छापली जात आहेत. नवनवीन प्रयोग होत असले तरी अधिकाधिक प्रमाणात बालसाहित्य लिहिले जावे आणि दर्जेदार बालसाहित्य पुढे यायला हवे. माझाही हाच प्रयत्न असून, बालसाहित्याच्या क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार जाहीर झाल्याचा खूप आनंद आहे.

## ३ हजार ६७४ कोटींच्या ड्रग्ज प्रकरणाचा तपास एनसीबीकडे वर्ग

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील कुरकुंभ कारखान्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील ड्रग्ज रॅकेट पुणे पोलिसांनी उघड केले आहे. यातून तब्बल ३ हजार ६७४ कोटी रूपयांचे तब्बल १ हजार ८३६ किलो मेफेड्रॉन जप्त केले होते. या गुन्ह्याची व्याप्ती आंतरराष्ट्रीय पातळीवरील असल्याने गुन्ह्याचा तपास आता पुणे पोलिसांकडून नार्कोटीक्स कन्ट्रोल ब्युरो (एनसीबी) कडे वर्ग करण्यात आला आहे. दि. १० जून रोजी कागदपत्रांसह हा तपास सूपूर्त करण्यात आला असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

या प्रकरणात वैभव उर्फ पिंट्या माने, अयज आमरनाथ करोसिया, हैदर नुर शेख, कुरकुंभ येथील अर्थकेम लॅब्रोटरीजचा मालक भिमाजी परशुराम साबळे, ड्रग्ज बनविण्यात माहिर असलेला युवराज बब्रुवान भुजबळ, आयुब मकानदार यांना अटक करण्यात आली होती. तर पुढे सुनील बर्मन, अशोक मंडल, शोएब शेख, पप्पु कुरेशी, अली शेख, सॅम उर्फ ब्राउन आणि मास्टर माईंड संदीप धुनिया यांच्यावरही या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पुण्यातील ललित पाटील ड्रग्ज प्रकरणाचा छडा लावल्यानंतर समर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून गुन्हे शाखेने मेफेड्रॉन विक्रेत्या वैभव मानेला अटक केली होती. त्याच्यासह त्याच्या साथीदारांकडून एक कोटींचे ड्रग्ज पकडण्यात आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर हे ड्रग्ज त्याला विश्रांतवाडी येथील हैदर शेखने दिले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. हैदरला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून पोलिसांनी १०५ कोटींचे तब्बल ५२ किलो ५२० ग्रॅम ड्रग्ज जप्त केले. पुढे त्याच लिंकचा आधार घेत पोलिसांना कुरकुंभ येथील अर्थकेम कारखाना गाठला. या ठिकाणाहून पोलिसांनी तब्बल १ हजार ३२७ कोटींचे सुमारे ६० लाखांचे ६६३ किलो ८०० ग्रॅम ड्रग्ज जप्त केले. हे सर्व मेफेड्रॉन कुरकुंभ येथील अर्थकेम कारखान्यातूनच तस्करी होत असल्याचे तपासात समोर आले. याच कारखान्यातून हे ड्रग्ज दिल्ली तसेच इतर राज्यात वितरीत होत असल्याचे देखील तपासात निष्पन्न झाले होते. येथीलच ड्रग्ज पुढे आंतराष्ट्रीय बाजारात म्हणजे विमानाद्वारे लंडनला देखील गेल्याचे निष्पन्न झाले होते. पुणे पोलिसांनी सांगली आणि दिल्ली येथील गोदामामधूनही मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज जप्त केले. यामध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणार्या संदीप धुनिया उर्फ धुणेचे नाव पुढे आले होते. तोच या ड्रग्ज प्रकरणाचा मास्टर माईंड असल्याचे नंतर तपासात निष्पन्न झाले आहे. आतापर्यंत याप्रकरणात १ हजार ८३६ किलो मेफेड्रॉन पकडण्यात आले आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ३ हजार ६७४ कोटी ३५ लाख ३० हजार इतकी आहे. या तपासावर सुरवातीपासूनच राष्ट्रीय तपास यंत्रणा एनसीबी, एनआय लक्ष ठेऊन होती. या प्रकरणाची लिंक आंतराष्ट्रीय पातळीवर जात असल्याने व याची दहशतवादी कारवाईशी काही लिंक आहे का ? या दृष्टीने तपासात स्थानिक येणार्या मर्यादा पाहता हा तपास आता पुणे पोलिसांकडून काढून एनसीबीडे देण्यात आला आहे. गुन्ह्यातील मुख्य आरोपी संदीप धुनिया याच्यासह साथीदारांचा शोध सुरू आहे. पुणे पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये आरोपींच्या टोळीने मुख्यत्वे हैदर शेख याने पप्पु कुरेशीला पुणे, महाराष्ट्रात तसेच दिल्ली येथे मेफेड्रॉन तस्करी करण्यासाठी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पप्पु कुरेशी हा सातत्याने संदिप धुणे उर्फ धुनिया, शोएब शेख यांच्या संपर्कात होता. त्याने आरोपींच्या मदतीने पुण्यात गोदाम भाडेतत्वावर घेतले होते. तेथे मेफेड्रॉन सापडले होते.



## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे पुणे विमानतळावर जंगी स्वागत

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुरलीधर मोहोळ शनिवार सकाळी पहिल्यांदाच पुण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी देखील पुणे विमानतळावर मोहोळ यांचे जंगी स्वागत केले.

ढोल ताशा, हलगी, आणि वारकऱ्यांच्या वेषातील मुलांनी मोहोळ यांचे स्वागत केले. यावेळी कार्यकर्त्यांनी मोहोळ यांना खांद्यावर उचलून घेत त्यांना पगडी परिधान केली. पुष्पहार घालून पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

## मराठा सेवा संघाने जमविले ५०० विवाह, सामाजिक बांधिलकीतून निरपेक्ष भावनेतून उपक्रम

बारामती : १५ लग्न जमणे ही आज एक समस्या होऊन बसली आहे. मनाजोगत स्थळ मिळण दिव्य झाले आहे. वधू आणि वर यांच्यामध्ये दुवा बनून लवकर लग्न जमण्यासाठी बारामती तालुका मराठा सेवा संघ जिजाऊ भवन यांच्या वतीने गेल्या सात वर्षांपासून सातत्याने काम सुरु आहे.



व्हॉटसअँप ग्रुपच्या माध्यमातून काल पाचशे लग्न जमण्याचा टप्पा पार झाला. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पूर्णपणे विनामूल्य सेवा देत पाचशे लग्न जमविण्याचे एक विधायक काम बारामती तालुका मराठा सेवा संघाच्या माध्यमातून प्रदीप शिंदे, जयकुमार मोरे, विजय तावरे, स्वाती ढवाण, सुनंदा जगताप, अनुराधा सपकळ, सुरेश कुटे यांच्या टीमने केले आहे. त्यांना संघाचे अध्यक्ष नामदेव तुपे, देवेंद्र शिर्के, दीपक बागल, पोपट वाबळे, प्रमोद शिंदे, मनोज पोतेकर, छाया कदम, जयश्री सातव यांनी सहकार्य केले आहे.

व्हॉटसअँप ग्रुपच्या माध्यमातून लग्न जमविण्यासाठी वधू वरांचे बायोडेटा सुरु करण्याचे काम बारामती तालुका मराठा सेवा संघाकडून सुरु झाले. बघता बघता त्याला चांगला प्रतिसाद मिळू लागला आणि राज्यभरातून त्यांच्याकडे लग्न जमविण्यासाठी मराठा समाजातील पालकांची मागणी येऊ लागली.

दैनंदिन कामकाज सांभाळून यातील प्रत्येक सदस्याने वधू वरांच्या पालकांना सविस्तर माहिती देण्याचे काम सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून केले ही बाब येथे महत्वाची आहे. कोणत्याही लाभाची अपेक्षा न ठेवता हे काम निरपेक्षपणे केले गेले. काल या ग्रुपच्या माध्यमातून पाचशे लग्न जमण्याचा टप्पा या संस्थेने ओलांडला. आज त्यांच्याकडे २५०० बायोडेटा आहेत. लग्न जमल्यानंतर या संस्थेचा एकही सदस्य लग्नातील सत्कारालाही जात नाही, कोठेही याची जाहिरात किंवा प्रसिध्दीही केली जात नाही. घटस्फोटित व विधवा महिला व पुरुषांचीही पुन्हा लग्ने व्हावीत या उद्देशाने त्यांचेही बायोडेटा गोळा केले जातात. लग्न जमविताना अनेकदा होणारी फसवणूक व इतर बाबी टाळण्याचाही यातून प्रयत्न केला गेला.

## आयुर्वेद मसाज केंद्राच्या नावाखाली वेश्याव्यवसाय, पोलिसांनी केली कारवाई

पुणे । प्रतिनिधी

सिंहगड रस्ता परिसरात आयुर्वेदिक मसाज उपचार केंद्राच्या नावाखाली सुरू असलेला वेश्या व्यवसायाचा पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने पर्दाफाश केला

माणिक बागेत जैन मंदिर शेजारी मोरया आयुर्वेदिक मसाज उपचार केंद्र येथे शुक्रवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी धाड टाकली या कारवाईत एका महिलेवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे तर तीन महिलांची सुटका केली आहे

सिंहगड रस्ता परिसरातील माणिक बाग येथील जैन मंदिराशेजारी असलेल्या आदर्श आपारमेंट मधील फ्लॅट नंबर दोन येथे मोरया आयुर्वेदिक मसाज उपचार केंद्र चालवले जात होते या उपचार केंद्राच्या माध्यमातून वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाला कळली त्यानुसार पथकाने बनावट ग्राहक पाठवून खात्री करून घेतली आणि छापा टाकून येथील व्यवसायाचा पर्दाफाश केला.

पीडित महिलांकडून हा व्यवसाय आरोपी चालवत असे. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात महिलेविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक अधिनियम कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सामाजिक सुरक्षा विभागाच्या महिला पोलीस हवालदार रेश्मा कंक यांनी फिर्याद दिली आहे

## आईस्क्रीममध्ये बोट सापडल्याचं प्रकरण, इंदापूरची फॉर्च्यून डेअरी बंद ठेवण्याच्या सूचना

पुणे । प्रतिनिधी

आईस्क्रीममध्ये मानवी बोट सापडल्याच्या प्रकरणात फॉर्च्यून डेअरी बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबईतील मालाडमध्ये एका महिलेला आईस्क्रीममध्ये मानवी बोट सापडल्याच्या घटनेने एकच खळबळ माजली आहे. ही घटना बुधवारी घडली. महिलेने ऑनलाइन डिलिव्हरी पद्वारे यम्मो कंपनीचं आईस्क्रीम मागवलं होतं. आता या प्रकरणात अन्न आणि औषध प्रशासनाने इंदापूरची फॉर्च्यून डेअरी बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

एफडीएने इंदापूरची फॉर्च्यून डेअरी बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. यम्मो आईस्क्रीममध्ये बोट सापडल्या प्रकरणी FDA ने या सूचना दिल्या आहेत. यम्मो कंपनी इंदापूर, गाजियाबाद आणि पुणे येथील कंपनीतून आईस्क्रीम घेते. आईस्क्रीमध्ये बोट कुठल्या कंपनीतील आईस्क्रीमध्ये सापडलं ते अद्याप समोर आलेलं नाही. बोट कुठल्या आईस्क्रीममध्ये सापडलं हे अद्यार माहिती नसलं तरी आईस्क्रीम मॅन्युफॅक्चरिंग बंद करण्याच्या सूचना अन्न आणि औषध प्रशासनाने दिल्या आहेत.

मुंबईच्या मालाडमधील एका महिलेने ऑनलाईन पद्धतीने यम्मो कंपनीचं (एचजख) आईस्क्रीम मागवले होते. तिने ते आईस्क्रीम कोन खायला सुरुवात करताच तिला त्यामध्ये मानवी



बोटाचा तुकडा दिसला. आईस्क्रीममध्ये मानवी अवयवाचा तुकडा पाहातच महिला ओरडू लागली आणि बेशुद्ध पडली. काही क्षण तिच्या कुटुंबातील लोकांनाही काहीच समजलं नाही. पण त्यांना सर्व प्रकार लक्षात येताच त्यांनी तात्काळ मलाड पोलीस ठाणे गाठलं. मालाड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## ८ चारचाकी, ९ मोटार सायकल चोरणारे 'बंटी बबली' गजाआड!

पुणे । प्रतिनिधी

चित्रपटात दाखवतात त्याप्रमाणे गंडा घालत वाहन चोरी करून नंतर ते भंगार मध्ये विकणे आणि पैसा कमवणाऱ्या प्रत्यक्षातील 'बंटी-बबली' ला सिंहगड पोलिसांनी अखेर गजाआड केले सिंहगड रस्ता पोलीसांनी वाहनचोरी करणाऱ्या पती-पत्नीकडून ८ चारचाकी आणि ९ मोटार सायकली असे एकूण १७ वाहनांच्या चोरीचे गुन्हे उघड केले.

सुमारे १२,७०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. 'बंटी अँड बबली' स्टाईलने ते चोऱ्या करत होते. यातील महिलेची नुकतीच प्रसुती झाली असून दीड महिन्याचे बाळ आहे. शाहरुख राजू पठाण आणि आयेशा शाहरुख पठाण (वय २१, दोघेही राहणार कुंजीर नगर, मूळ पत्ता वार्ड नंबर ५ निरा, ता. बारामती) अशी आरोपींची नावे आहेत.




दोघेही सराईत असून दोघांवर विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल आहेत. फेब्रुवारी महिन्यात ते तुरुंगातून जामिनावर सुटले आहेत. आयेशा ही गर्भवती असताना सुद्धा चोऱ्यांच्या उद्योगात सामील होत होती. तपास पथकातील पोलीस अंमलदार उत्तम तारु, राहुल ओलेकर, शिवाजी क्षिरसागर यांना माहिती मिळाली की, एक पुरुष आणि एक महिला संशयास्पद रित्या लोणीकाळभोर येथील वडकीनाला भागामध्ये रस्त्याच्या कडेला एका कारमध्ये बसले आहे. दोघे मिळून चारचाकी आणि दुचाकी वाहन चोरी गुन्हे करत आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन निकम, पोलीस उप निरीक्षक संतोष भांडवलकर आणि त्यांच्या पथकाने या दोन संशयीतांना ताब्यात घेतले. अटक करुन चौकशी केली असता, आरोपींनी संपूर्ण पोलीस आयुक्तालयात हद्दीत १७ दुचाकी व चारचाकी वाहन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

त्यातील चोरी केलेल्या एकुण ८ चारचाकी व ९ दुचाकी वाहने असा मुददेमाल आरोपींनी जप्त केला. आरोपी पती पत्नी असून ते पुणे शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी लॉजवर राहून दिवसभर टेहळणी करत. रात्री बाहेर पडून चारचाकी, दुचाकी वाहने चोरी करत. दोघे गाडीत असल्याने कोणालाही संशय येत नसे. ही वाहने आरोपींनी नागपूर, शिर्डी, श्रीरामपूर येथे विकली होती. गुन्हयातील एकुण १७ वाहने असे एकुण १२,७०,००० किंमतीचा मुददेमाल जप्त करण्या आला आहे. सचिन निकम आणि संतोष भांडवलकर यांच्या पथकाने सलग दोन महिने दोघा आरोपींचा मागोवा घेतला. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार सह आयुक्त प्रविण पवार, अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग प्रविणकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त परीमंडल ३ संभाजी कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त जगदीश सातव वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.पोलीस अंमलदार आबा उत्तेकर, संजय शिंदे, उत्तम तारु, राजु देगरे, विकास बांदल, अमोल पाटील, विकास पांडोळे, देवा चव्हाण, शिवाजी क्षीरसागर, राहुल ओलेकर, सागर शेडगे, स्वनील मगर, विनायक मोहिते, शिरीष गावडे या पथकाने सहभाग घेतला.